शनिवार / २४ नोव्हेंबर १९७९

# माणूस

पंचाहत्तर पैसे

नामांतर हे आता केवळ एक निमित्त उरलेले आहे.
खरा संघर्ष आहे दोन अस्मितांचा.

## या संघर्षाचा शोध

'माणूस' प्रतिनिधींनी मराठवाड्यात जाऊन घेतलेला.

माणूस प्रतिनिधींनी घेतलेल्या भेटीगाठी

म. भि. चिटणीस
गोविंदभाई श्रॉफ
अनंतराव भालेराव
बापूसाहेब काळदाते
शरद् पाटील
सुभाष लोमटे
मोहन देशमुख
बापूराव जगताप
मनोहर गरुड
गंगाधर पानतावणे
के. रं. शिरवाडकर
कमलाकर ठकार
रतनकुमार पंडागळे
काशीनाथ भागाजी बोर्डे
आणि इतर

या भेटीगाठींवर व मुलाखतींवर आधारित
या पुढील अंक

## माणूस :
## मराठवाडा विद्यापीठ
## नामांतर विशेषांक

पृष्ठसंख्या नेहमीची. किंमतही नेहमीची – ७५ पैसे.
ज्वलंत प्रश्नावरील एक समयोचित विशेषांक



# सप्रेम नमस्कार

▫ आपल्या 'माणूस'च्या दिवाळी अंकात सौ. वीणा गवाणकर यांनी लिहिलेली वॉशिंग्टन कार्व्हर यांची जीवनगाथा वाचताना मी त्यात गुंग होऊन गेलो. सौ. वीणाताईंनी ही जीवनगाथा लिहून वाचकांवर अमूल्य उपकार केले आहेत असे वाटते. या महामानवाचे नाव अनेक वर्षे ऐकत होतो व मुख्यत: त्याचे 'शेंगदाणे' यावर अमूल्य संशोधन आहे, त्याची प्रयोगशाळा रिकामे डबे वगैरे वस्तूंची होती हे ठाऊक होते. पण त्याचे जीवनचरित्र संपूर्ण ठाऊक नव्हते. ती कसर सौ. वीणाताईंनी भरून काढून मराठी वाङ्मयाचे दालन सुशोभित केले आहे असे म्हणणे योग्य होईल.

अमेरिकेने तीन वॉशिंग्टन पैदा केले. १) जॉर्ज वॉशिंग्टन–अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा उद्गाता २) बुकर टी. वॉशिंग्टन–टस्केगी विश्वविद्यालयाचा रचनाकार आणि ३) वॉशिंग्टन कार्व्हर.पैकी दुसरे व तिसरे निग्रो. मी शाळेत असताना श्री. नागेश गुणाजी यांनी मराठीत लिहिलेले बुकर टी. वॉशिंग्टन यांचे चरित्र वाचले व तेव्हापासून त्या चरित्राचा मनावर प्रभाव होता. केव्हातरी अमेरिकेत गेलो तर टस्केगी संस्था पहाण्याची इच्छा होती. तथापि ती फलद्रूप झाली नाही. परंतु १९७२ साली मी अमेरिकेत मुलीकडे गेलो असता, माझ्या जामातांनी बुकर टी. वॉशिंग्टनच्या स्मरणार्थ अमेरिकन सरकार तयार करीत असलेला नॅशनल पार्क पहाण्याची संधी आणून दिली. आम्ही जेव्हा तिथल्या ऑफिसमधील निग्रो स्वागतिकेला म्हटले, की आम्ही हिंदुस्थानातून आलो असून हा पार्क पाहण्याची इच्छा आहे, तेव्हा तिला खूप आनंद झाला व तिने आत जाऊन पार्क प्रमुखाला सांगितले. (तो प्रमुखही निग्रोच) त्याने एकदम बाहेर येऊन भारतात कुठे असता, तुम्हाला बुकर टी. बद्दल माहिती आहे का वगैरे चौकशी केली. मी जेव्हा म्हटले, की मी गुणाजी यांनी मराठीत लिहिलेले चरित्र अनेक वर्षांपूर्वी वाचले आहे व म्हणून आम्हाला हा पार्क पहावासा वाटला तेव्हा त्याला पण आनंद वाटला व तो म्हणाला, 'चला मीच तुम्हाला दाखवायला येतो. अजून काम पूर्ण होण्यास बराच काळ लागेल !' या पार्कचे महत्त्व असे की ज्या झोपडीत (Log cabin) त्याच्या आई भावंडांजवळ त्याचे बालपण गेले, त्या झोपडी भोवती हा पार्क आहे. झोपडी, त्यातली धूळ साचलेली कच्ची जमीन, त्याच्या मध्यभागी-बटाटे साठविण्याचा खड्डा, आई ज्यावर डुक्कर भाजी ती भट्टी, त्यातील काटा,धुळीच्या जमिनीवर खड्ड्याभोवती चिंध्या पसरून निजत ती जागा वगैरे त्याच स्थितीत कायम ठेवले आहे. झोपडीच्या दारावर एक टेप वादक व लाऊड स्पीकर असून सामान्यत: बुकर टी. च्या आवाजास जुळेल अशा आवाजात आत्मचरित्रातील झोपडी आदी विषयक भाग व्हिजिटर्संना वाजवून दाखविण्याची व्यवस्था आहे. तिथे मी आत्मचरित्राची एक प्रत विकत घेतली व त्या पार्क प्रमुखाने त्यासंबंधी काही माहिती पत्रके दिली.

माझ्याशी आपली अथवा सौ. वीणाताई यांची व्यक्तिगत ओळख नाही. पण त्यांच्या लिखाणाने मला मंत्रमुग्ध केले हे कळविण्यासाठी व बुकर टी. च्या नॅशनल पार्कचे वर्णन त्यांना आवडेल असे वाटल्यामुळे हे पत्र पाठवीत आहे.

आपणास व सौ. वीणाताई यांना वॉशिंग्टन कार्व्हर यांचे चरित्र प्रसिद्ध करण्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

ता. क.– आपणास काही सुचवू का ?

(१) अमेरिकेत राल्फ नाडर हा Consumers Protection Movement चा प्रणेता. याचा जन्म १९३४ चा. बाप मूळचा लेबानीज– अमेरिकेत त्याने हॉटेल चालविले. राल्फ लॉ ग्रॅज्युएट आहे. तो वॉशिंग्टनमध्ये राहतो. त्याचे चरित्र अद्भुत आहे. त्याने प्रथम DDT शिपडण्याविरुद्ध चळवळ केली. नंतर General Motors शी टक्कर दिली. १९६९ साली त्याने Centre for Responsive Law व त्याच्या शाखा काढल्या. त्याच्या प्रयत्नाने बरेच Consumer Protection Laws करावे लागले. तो अमेरिकेच्या सीनेटच्या निवडणुकीस तयार नाही. त्याच्या कामाला अनेक शास्त्रज्ञ,

पृष्ठ २४ वर


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : सव्विसावा
२४ नोव्हेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# मूर्तिभंजक मृणाल

श्री. ग. मा.

श्रीमती मृणाल गोरे आणि मोहन धारिया या दोघांच्या निवडणुका आतापासूनच गाजूवाजू लागलेल्या आहेत. यापैकी मृणाल गोरे यांचा प्रश्न खरा अवघड व नाजूक आहे. कारण मृणाल गोरे यांनी जनता पक्ष फोडण्यास हातभार लावलेला असला तरी व्यक्तिगत पातळीवर त्या एक तळमळीच्या व जिद्दीच्या कार्यकर्त्या म्हणून अजूनही आपले स्थान व लौकिक टिकवून आहेत. धारिया हे वेलीवरच्या फुलाप्रमाणे आहेत. वेल नेहमी कुणाच्यातरी आश्रयाने वाढत असते. तसे मृणालबाईंचे नाही. ज्या मतदारसंघातून त्या निवडणूक लढविणार आहेत त्या मतदारसंघात त्यांचे संबंध खोलवर रुजलेले आहेत. गेली दोन-अडीच वर्षे तरी त्या दिल्लीत अडकलेल्या होत्या व तेथील वातावरणाचा परिणाम म्हणूनच की काय, दोन वेळा कारण नसताना, उगाचच कुणाच्या तरी निमंत्रणावरून, कुठेतरी परदेशी चक्कर मारून आलेल्या असल्या तरी मतदारसंघावरचा त्यांचा प्रभाव अद्याप फारसा कमी झालेला नाही. त्यामुळे वेलीवरच्या फुलासारखे धारिया कितीही डोलत राहिले तरी पुण्यात त्यांचा पराभव होईल हे जसे ठामपणे कुणालाही सांगता येते, तसे मृणालबाईंच्या बाबतीत भविष्य वर्तविता येत नाही. जनता पक्ष फुटल्यामुळे इंदिरा गांधींचे हात आणि पाय दोन्ही बळकट झाले हे जरी आता सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ झालेले असले तरी मृणालबाई या घट्ट विचारांच्या कार्यकर्त्या असल्याने त्यांना अद्याप आपली चूक उमजत नाही असे दिसते. त्यांनी जनता पक्षाकडे पाठिंबा मागितला हे खरे; पण याचा अर्थ त्यांनी याचना केली, आपली चूक कबूल केली, पश्चात्ताप व्यक्त केला असा होत नाही. उलट त्यांच्या निवेदनाचा सूर व भाषा पाहता जनता पक्षालाच त्या सुधारण्याची, आपल्या उद्घोषित धोरणाची अंमलबजावणी करण्याची संधी देत आहेत असे वाटते! त्या आपल्या निवेदनात म्हणतात: हुकुमशाही शक्तींच्या विरोधात एकास एक उमेदवार उभा करण्याचे तत्त्व पुलोदमधील घटक पक्षांनी स्वीकारले आहे. ते उत्तर मुंबई मतदार संघात पाळावे. जनता पक्ष पुलोदमधील घटक पक्ष या नात्याने आपले बहुचर्चित धोरण राबवू शकत नसेल तर या पक्षाने हुकुमशाही शक्तींचा पराभव हे आपले पहिले उद्दिष्ट असल्याची बात करू नये.' म्हणजे जनता पक्षाने आपण हुकुमशाहीविरोधी आहोत हे सिद्ध करण्यासाठी मृणाल गोरे यांना पाठिंबा देण्याची संधी गमवू नये असा या निवेदनाचा एकूण ताठा आहे. शिवाय असा पाठिंबा पुलोदमधील जनता पक्षाकडेच नाही, इतरही सर्व पुलोद घटकपक्षांकडे मृणालबाईंनी मागितलेला आहे. निवडणुकात पाठिंबा मिळेल तिथून घेतला जातो, दिला जातो, मागितलाही जातो. याचा अर्थ मृणालताईंनी 'याचना' केली असा होत नाही. लहान लहान समाजवादी वर्तुळात त्यांची जी भाषणे होतात त्यातील सूरही तसा चढाच आहे. म्हणून त्या वाकतील, पक्षद्रोहाबद्दल जाहीर वा खाजगी माफी वगैरे मागतील ही शक्यता नाही. जनता पक्षानेच आता किती सैल व मऊ राहायचे, न राहायचे ते ठरवून, एकदा या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावून टाकला पाहिजे. चंद्रशेखरांनी मुंबईत केला तसा अर्धवटपणा करून उपयोग नाही. मुंबईतील नुकत्याच झालेल्या जनता पक्ष कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात हा इसम पक्षद्रोह्यांनी क्षमा मागितल्याशिवाय त्यांना पाठिंबा नाही असे वीरश्रीयुक्त भाषण ठोकतो; आणि दुसऱ्या दिवशी पत्रकारांना मात्र हे माझे 'वैयक्तिक मत' असल्याचा खुलासा करतो. मग गृहस्था, मेळाव्यात बडबड केलीस ती कशासाठी? तुझी वैयक्तिक, खाजगी मते

ऐकायला का कुणी तिथे जमलेले होते ? तेव्हा असला धरसोडपणा कमी झाला पाहिजे. जे करायचे तेच आणि तेवढेच बोलायला हवे. मृणालबाईंसारख्या पक्ष-फोड्यांना पाठिंबा द्यायचा नसेल तर तसे जाहीर व खाजगी खणखणीतपणे एकदा ठरवा आणि एखादा जबरदस्त उमेदवार त्यांच्या विरोधात उभा करण्याच्या प्रयत्नाला लागा. केवळ भाषणांनी मृणालबाईंचा पराभव घडवून आणायला त्या काय धारिया थोड्याच आहेत ? जनता पक्षाने पाठिंबा दिला न दिला तरी जनता पक्षातील समाज-वादी गट मृणालबाईंसाठी काम करणार हे उघड आहे. मग यात जनता पक्षाचेच नाक कापले गेले तरी त्याची कुणाला पर्वा वाटणार नाही. आठवावी पुण्यातील कार्पो-रेशनची निवडणूक. जनता पक्षाध्यक्ष अण्णा जोशी यांना कसे पाडण्यात आले ? तसेच मृणालबाईंच्या बाबतीतही घडल्याशिवाय राहणार नाही. ही अटीतटी नको असेल तर तहाच्या वाटाघाटी करा आणि दोन्ही पक्षांना मान्य होईल असा एखादा पर्याय हुडकून काढा. अनिश्चितता घातक. हा एक पर्याय असू शकतो—

समजा मृणालबाईंनी आपल्या विश्वासातली एखादी व्यक्ती आपल्याऐवजी निवडणुकीसाठी उभी केली तर काय हरकत आहे ? उदाहरणार्थ, पुष्पा भावे हे नाव चटकन डोळ्यासमोर येते. त्या मृणालबाईंच्या पूर्ण विश्वासातल्या आहेत. समाजवादी वर्तुळातही त्यांची चांगली उठबस आहे. जनता पक्षाच्या तर त्या पदाधिकारी आहेतच. पक्ष स्थापन झाल्यापासूनच पदराला खार लावून त्या पक्षाची अनेक कामे आजवर निष्ठापूर्वक करीत आलेल्या आहेत. कुठे मराठवाड्यातले एखादे शिबिर असो, मुंबईतला तरुणां-साठीचा अभ्यासवर्ग असो किंवा निवडणुकांच्या रात्री-अपरात्री चालणाऱ्या सभा असोत. पुष्पाबाई आपल्या प्राध्यापकी जबाबदाऱ्या सांभाळून या सर्व ठिकाणी अग्र-भागी रहात आलेल्या आहेत. तडजोड म्हणून अशा एखाद्या व्यक्तीचे नाव मृणालताई आणि जनता पक्ष यांनी का स्वीकारू नये ? मृणालताईंसाठी मुंबईतच खूप काम बाकी आहे. एकतर त्यांची जनता पक्ष फोडण्यामागील भूमिका बहुसंख्य लोकांना मान्यच नाही. ती पटवून देण्याचे मोठे काम त्यांना करावयाचे आहे. शिवाय ज्या कामात त्यांचे विशेष प्राविण्य आहे, ते महागाई—भ्रष्टाचार विरोधी आंदोलन त्यांची वाट पाहतेच आहे. त्या दिल्लीला गेल्यापासून नाहीतरी मुंबईतील ही आघाडी थंडावलेलीच आहे. राजवट पुलोदची असो नाहीतर कॉंग्रेस—जनताची असो. लहानमोठे अन्याय—अत्याचार, भ्रष्टाचार घडतच राहणार. याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी, भ्रष्ट व अकार्य-क्षम व्यक्तींना, राज्यकर्त्यांना, अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यासाठी जनआंदोलनांचा डोंब उसळवावाच लागतो. हे मृणालबाईंनी पूर्वी तडफेने केले म्हणून त्यांचे नेतृत्व उभे राहिले. व्यक्तिशः त्यांच्याबद्दल लोकांमध्ये आदरभाव निर्माण झाला. हा आदरभाव त्या केवळ एक राजकारणी व्यक्ती असत्या तर कधीही निर्माण होऊ शकला नसता. भाव वाढ आणि महागाई तर आकाशाला भिडते आहे. लोकसभेत जाऊन याविरुद्ध काही आवाज उठवण्यापेक्षा लाटणेमोर्चा-सारखे कार्यक्रमच अशावेळी परिणामकारक ठरण्याची शक्यता अधिक आहे. शाखा हे जसे संघाचे मर्मस्थान आहे तसे स्थान लोहियावादात जनआंदोलनांना आहे. मृणाल-ताईंनी हे स्थान पुन्हा बळकट केले तर हवे आहे. नाहीतरी लोकसभेतील त्यांची २८ महिन्यातली कामगिरी तरी काय मोठी डोळ्यात भरण्यासारखी झाली? मुंबईतील पाणीवाली बाई दिल्लीत गेल्यावर कुणालाही पाणी पाजू शकलेली नाही. उलट दिल्लीतल्या पाणीवाल्या बाईनेच यांच्या तोंडचे पाणी पळवले. समजा अगदी मृणालताईंना मंत्रिपद मिळाले असते तरी परिस्थिती फारशी बदलली नसती. कारण जनआंदोलनांचे रान उठवणे वेगळे आणि शासनाचा गाडा चालविणे वेगळे. जॉर्ज फर्नांडिस हे उद्योगमंत्री. त्यांच्या टेबलावरील फायली त्यांनी पाहण्यापूर्वीच उद्योग—पतींना त्यातील हवी ती गुप्त माहिती काढून घेता येत होती, असे त्यांनीच एकदा जाहीरपणे सांगितले होते. हा कसला शासनकर्ता ? मृणालताईंची गत काही वेगळी झाली नसती. एखादे निमित्त साधून त्या या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचीच शक्यता अधिक होती. पुढील २—४ वर्षे पुन्हा या चक्रव्यूहात अडकायचे की मुंबईतला—महाराष्ट्रातला आपला किल्ला अधिक बळकट करायचा, असा मृणालताई-समोर पर्याय आहे व आपल्या विश्वासातली एखादी व्यक्ती दिल्लीसाठी पुढे करून त्या हे दोन्ही पर्याय पदरात पाडून

घेऊ शकतील. शिवाय या निवडणुकीत कुणालाच स्पष्ट बहुमत मिळणार नसल्याने दिल्लीत तरी आताच जायची घाई करण्यात काय मतलब आहे ? थोडे थांबणे श्रेयस्कर ठरेल. धारियाही असाच विचार करीत नसतीलच असे नाही. उगाच तत्त्वाबित्वासाठी दहा-प.च लाख रुपयांचा चुराडा करण्याइतके ते निश्चितच अव्यवहारी नाहीत ! ◻

पण हे होणे नाही. लोहियाकुलामध्ये अशा प्रकारचा समंजसपणा आजवर दिसलेला नाही. मग मृणालताई तरी तो कसा दाखवू शकणार ? त्यांची संघर्षप्रियता, त्यांची जिद्द त्यांना स्वस्थ बसू देणार नाही. सगळ्याच युद्धात सेनापती काही आघाडीवर जाऊन लढत नसतो; पण हे त्या ध्यानात घेणार नाहीत. मोडेन पण वाकणार नाही असा त्यांचा बाणा आहे. मग ज्याच्यासाठी मोडायचे तेच मोडून पडले तरी चालेल, अशा टोकाला अशी मंडळी जात असतात. लोहिया म्हणजे गैरकाँग्रेसवादाचे प्रवर्तक. काँग्रेस हटावचा एककलमी कार्यक्रम त्यांनी ६७–६९ मध्ये दिला, त्यासाठी जनसंघासकट उत्तर भारतात विरोधी पक्षांची एकजूट बांधण्याचा त्यांनी प्रयत्नही केला. हे ध्येय ७७मध्ये पुष्कळ अंशाने साध्य झाले व काँग्रेसचे निदान उत्तरेत तरी नामोनिशाण राहिले नाही. दोनच वर्षे उलटली नाही तो त्यांच्या अनुयायांनी काय केले ? काँग्रेसला जीवदानच दिले असे नाही, तिला पुन्हा सत्तेवरही आणून बसवले. वर्तुळ उलट बाजूने पूर्ण केले. महाराष्ट्रात आणि देशातही. काँग्रेसहटावकडून काँग्रेसबिठाव असा लोहियावाद्यांचा हा निरर्थक प्रवास झाला. आता जनताहटाव सुरू झाले आहे. हटाववादावाचून दुसरा उद्योगच जणू नाही. मूर्तिभंजनाचे हे एक विकृत आकर्षण आहे. किंबहुना हा एक लोहियावाद्यांचा स्थायीभावच दिसतो. खुद्द लोहियांनीदेखील नेहरूंचे मूर्तिभंजन केले नाही का ? यात ते यशस्वी झाले नाहीत हा भाग वेगळा ! पण मानसिक समाधान तर लाभले ! हाच वारसा अनुयायी पुढे चालवत आहेत असे दिसते. फक्त लोहियांनी जी मूर्ती तोडण्याचा प्रयत्न केला तीच मूर्ती पुन्हा स्थापन होण्याची गफलत होत आहे, इकडे अनुयायांचे दुर्लक्ष झाले. महाराष्ट्रात या लोहियावाद्यांना पवार चालतात, दिल्लीत नेहरूंना आपला आदर्श मानणारे यशवंतराव जवळचे वाटतात, याची संगती एरवी कशी लावायची ? ही मूर्तीभंजनाची प्रेरणा मृणालताईंना स्वस्थ बसू देणार नाही. एखादी तडजोड काढून तात्पुरती माघार घेण्याचा पर्याय त्या स्वीकारणार नाहीत आणि दोन अडीच वर्षे ज्यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले, आणीबाणीत ज्यांच्या साहाय्याने हुकुमशाहीविरोधी लढा दिला त्यांच्याशी झुंज घेण्यात विनाकारण आपली शक्ती त्या वाया दवडतील. जिंकल्या तरी केवळ व्यक्तिगत पुण्याईवर जिंकतील. त्यामुळे लोकशाहीचे, समाजवादाचे काही भले होणार आहे असे नाही. आणि त्यांच्याच तोलामोलाचा एखादा उमेदवार जनता पक्षाने पुढे आणला तर जिंकण्याची आशा जवळजवळ नाहीच, कारण व्यक्तिगत त्यांच्याविषयी आदर असला तरी त्यांनी केलेल्या पक्षद्रोहाला सर्वसामान्य जनतेने अद्याप क्षमा केलेली नाही. आणि करूही नये. केव्हातरी मृणालताईंसारख्यांना हे कळले पाहिजे, की हा देश मूर्तिभंजकांचा नाही. येथे मूर्तिपूजा चालते. पण मूर्ती विसर्जनाच्याही येथे मोठमोठ्या मिरवणुका निघतात. भंजनापेक्षा विसर्जन हे अधिक सुसंस्कृतपणाचे लक्षण नाही का ? ◻

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

–डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# एक नवा संकल्प

## एक नवा संकल्प-एक नवी योजना
## दर महिन्याला एकतरी पुस्तक घ्या

पुणे येथे गोखले हॉलमध्ये भरलेल्या पुस्तक प्रदर्शनाचा लाउडस्पीकरवरून तरुण प्रकाशकांचा बुलंद ध्वनी, लक्ष्मीरोडवरील गोंगाटावर चढून दणाणत होता. ' दिवाळीत आपल्या प्रियजनांना पुस्तके भेट द्या. ' तो ध्वनी पुन्हा पुन्हा सांगत होता. आश्चर्य म्हणजे लोक येत होते, प्रवेशिकांसाठी रांगा लावीत होते आणि महत्त्वाचे म्हणजे, पुस्तके विकत घेत होते.

या तरुण प्रकाशकांनी एक गोष्ट ओळखली आहे, असे दिसते. ग्रंथ ही आदरणीय गोष्ट असेल. ग्रंथ हे सरस्वतीच्या मंदिराचे स्तंभ असतील, प्रत्येक लेखक व्यासवाल्मिकी असेल, ग्रंथ हे जगाचे तारक असतील, ग्रंथ-प्रकाशन हे पवित्र कार्य असेल आणि ग्रंथ-विक्री पवित्र व्यवसाय असेल, हे सारे असले तरी ग्रंथ व्यापाराची वस्तु आहे. ती तयार करायला द्रव्य मोजावे लागते. आणि ती विकली गेली तरच मोजलेले द्रव्य परत मिळते. म्हणजेच बाजारात इतर वस्तूंच्या जाहिराती करितात, तशाच पुस्तकांच्या केल्या पाहिजेत. प्रत्येक दंतधावन दाताना बळकटी आणते. प्रत्येक टॉनिक, शक्तिवर्धक असते. तसेच ग्रंथांबद्दलही ओरडून सांगितले पाहिजे की ग्रंथांचे वाचन चिंता दूर ठेवते, ग्रंथवाचनाने माणूस चतुरस्र होतो, ग्रंथातून ज्ञान मिळते, सुसंस्कृत होण्यास ग्रंथ वाचा, घर बसल्या अत्यंत स्वल्प पैशात करमणूक करून घेण्याचे साधन म्हणजे ग्रंथ. त्यांचे म्हणणे की लोकांनी स्टेनलेसची भांडी, सोफासेट, डेकोरेशन्स, वस्त्रप्रावरणे वगैरे-साठी जरूर खर्च करावा; पण खर्चाच्या या यादीत ग्रंथाचे नावही घालावे. लग्न-प्रसंगी त्याच त्याच बॅगा, तेच तेच बेडलँप, तीच तीच स्टेनलेसची भांडी देऊन परस्परांना बोअर करण्यापेक्षा वधूवरांना विविध विषयाचे ग्रंथ भेट देऊन त्यांचे जीवन समृद्ध करावे.

□

लोकांना पुस्तके विकत घेणे सुचावे म्हणून या नव्या रक्ताच्या प्रकाशकांनी पुस्तक जत्रेचा घाट घातला. हा घाट बांधण्यास त्यांना संपूर्ण वर्ष लागले. म्हणजे वर्षभर ' जत्रा भरवावी का ? ' या प्रश्नावर चर्चा चालली होती. सरिता प्रकाशनाचे श्री. ह. अ. भावे यांनी सांगितले की, अशी जत्रा फेल ज़ाईल असे सिनिअर प्रकाशकांचे अभिप्राय आले. या प्रकाशकाचे म्हणणे की, मॅजेस्टिकचे केशवराव कोठावळे पुस्तकाचे प्रदर्शन दरवर्षी भरवतातच. अशा दुसऱ्या जत्रेस जागा नाही. त्यांतून तुमची संस्था नवीन. तुमची जत्रा फेल जाण्याची भीती आहे.

पुस्तक जत्रेबद्दलचा दुसरा प्रश्न जत्रा पहायला तिकीट ठेवावयाचे का हा होता. त्याही बाबतीत अशी मते आली की, पुस्तक-जत्रा पहायला कधी कुणी तिकीट काढून आलाय का ? तिकीट काढून कुणी येणार नाही. म्हणजेच विक्री होणार नाही आणि पुण्याची पब्लिक तर मुळीच रिस्पॉन्स देणार नाही. (आपणही पुण्याचे आहोत हे ते मत देणारे विसरले.) अशा स्थितीत प्रकाशक प्रदर्शनात स्टॉल घेण्यास तयार होतील कां ? विक्री होणार नसेल तर स्टॉल कशाला असे ते म्हणतील.

सांगितल्याप्रमाणे मागील दिवाळीत य चर्चा सुरू होऊन दिवसांवर दिवस जाऊ लागले. तेव्हा मराठी प्रकाशक परिषदेच्या कार्यकर्त्यांनी ठरविले की चर्चा थांबवाव्या. जत्रा भरवावी की नाही हा निर्णय व भरावावयांची ठरली, तर नंतरची कार्यवाही परिषदचे कार्यकर्ते श्री. शरद गोगटे व श्री. दास्ताने यांजवर सोपवावी. ते घेतील तो निर्णय परिषदेनं मान्य करावा.

□

काही वाचकांना वाटेल की रस्तोरस्ती रोज प्रदर्शने भरवली जातात आणि एका प्रदर्शनासाठी केवढया चर्चा ! या वाचकांनी हे लक्षात आणावे की ती रोज भरणारी प्रदर्शने पातळांची असतात, कापडांची असतात आणि ही जत्रा पुस्तकांची होती. पुस्तकांची एक जत्रा भरविण्यास वर्षभर विचार करावा लागतो. यावरून मराठी पुस्तकांच्या खपाची अवस्था लक्षात यावी. ज्या ग्रंथामुळे आपल्याला ज्ञान मिळते, आनंद प्राप्त होतो ते ग्रंथ वाचकांनी अधून-मधून विकत घेण्याचे ठरविले तर चर्चा न होता पुस्तकांच्या जत्रा इतर जत्राप्रमाणे रोज भरतील.

ग्रंथामुळे आनंद प्राप्त कसा होतो व

समाधान कसे लाभते याचा एक अनुभव येथे सांगितल्यावाचून राहवत नाही. माझ्या वडिलांचे पोष्टातले एक जुने सहकारी बदली होऊन पुण्यास आले. माझ्या वडिलांना ते खूपच लहान. वडिलांना ते फार मानत. त्यामुळे माझ्यावर त्यांचा लोभ होता. पुण्यास बदलून आल्यावर ते नेहमी आमच्याकडे येत. माझ्या वडिलांच्या आठवणी जिव्हाळ्याने सांगत. नंतर या गृहस्थांचा षष्ठ्यब्दिपूर्ति समारंभ झाला. त्या समारंभाला त्यांनी मला जेवावयास बोलावले.

साठीच्या प्रसंगी त्यांना काय भेट द्यावी हा प्रश्न आला. घरात चर्चा झाली. चांदीचे किंवा स्टेनलेसचं भांडं आमच्या अंदाजात बसत नव्हतं. शिवाय अशी वस्तू त्यांना कितपत उपयोगी होईल याची खात्री नव्हती. कारण पोष्टातील लोक राहणीत सामान्यपणे साधे असतात. त्यांना काय आवडेल याचा विचार करिता करिता एकदम 'नवनीत' हा ग्रंथ आठवला. आपल्या जुन्या कवींची निवडक काव्ये एकत्र केलेला हा काव्यसंग्रह गेल्या तीन पिढ्यांचा आवडता होता. घरोघरी तेव्हा 'नवनीत' असे. हाच ग्रंथ त्यांना भेट द्यावयाचा ठरवून महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केलेली एक प्रत घेऊन रंगीत कागदात गुंडाळून एकसष्टीला गेलो. मी गेलो तेव्हा मंत्राविधी संपले होते. आणि ते गृहस्थ अहेरांचा स्वीकार करीत होते. मीही पुढे होऊन माझा 'नवनीत' चा अहेर देऊन पाया पडलो व बाहेरच्या हॉलमध्ये येऊन बसलो. तिथे इतर निमंत्रित बसले होते. शंभर एक मंडळी असावीत. काही वेळ गेला. अहेर देणे संपले. जरा वेळाने माझ्या वडिलांचे मित्र सोवळे नेसलेले, अंगावर शाल घेतलेले असे, बाहेर आले. हॉलमधील सर्व निमंत्रितासमोर उभे राहून ते म्हणाले, 'मंडळी ! मला आज आलेली अपूर्व भेट तुम्हाला दाखवितो.' असे म्हणून त्यांनी हातातला 'नवनीत'चा ग्रंथ उंच धरून सर्वांना दाखवून म्हटले, 'मोकाशी मास्तर तुमच्यापैकी काहींना आठवत असतील. त्यांचा मुलगा येथे आलाय. त्यानं हे पुस्तक मला भेट दिलंय. 'नवनीत' नावाचे हे प्रख्यात पुस्तक आहे. गेली कित्येक वर्षे 'नवनीत' घेण्याचे माझ्या मनात होते, आज एकसष्टीला मला ते मिळाले याचा फार आनंद होत आहे. तुम्ही मंडळींनी मला खूप वस्तू भेट दिल्या. कुणी शाली दिल्या. कुणी चांदीची भांडी दिली, कुणी रेशमी कापड तर कुणी सुंदर बॅगा, अशा उंची उंची वस्तू दिल्या. पण या नवनीत ग्रंथाने मला जेवढा आनंद झाला तेवढा या कुठल्याही वस्तूने झाला नाही.

हे म्हणताना त्यांच्या डोळ्यातून अक्षरशः अश्रू वाहू लागले. ते पुन्हा ते आत गेले.

पुस्तकामधून केवढं समाधान व आनंद मिळतो हे या प्रसंगावरून कळावे. साठी ओलांडीत असता एखाद्याने सांगितले की, सोने चांदी वस्त्रे वगैरे सर्वाहून ग्रंथ श्रेष्ठ, तर ते आपण मानायला हवे, कारण ते अनुभवाचे बोल असतात. फक्त हा आनंद वाढवण्यासाठी मी त्यात एक सुधारणा सुचवितो. निवृत्तीनंतर लोक वाचन करावयाचे ठरवितात तेवढे चूक आहे. तुम्ही निवृत्तीनंतर ज्ञानेश्वरी वाचावयाची ठरवली पण आधी जर कधी वाचली नसेल तर ज्ञानेश्वरी आपल्याला कळत नाही याचा तुम्हाला पहिला धक्का बसेल आणि त्यात रस वाटत नाही हा दुसरा धक्का बसेल आणि नको त्या वयात बसेल. त्यासाठी आपल्या आवडत्या विषयांच्या पुस्तकांचे आयुष्यभर वाचन असावे. आयुष्यभर त्या विषयावरचे ग्रंथ विकत घेऊन संग्रही ठेवावेत.

मी सांगतो हे सर्व तरुण पिढीनं लक्षांत ठेवायचं आहे. पुस्तके विकत घ्या, असे मी म्हटले ती प्रकाशकांची जाहिरात नाही किंवा माझी नाही. एका शहाण्या माणसाने सांगितले आहे की तुम्ही नोकरीत असा किंवा धंद्यामध्ये असा, वेगवेगळ्या विषयावरील ग्रंथाचे वाचन हे तुम्हास सुसंस्कृत ठेवावयास, जगाचे ज्ञान होण्यास, आयुष्य रमून घालविण्यास, विचारशक्ती वाढविण्यास, मन संवेदनाक्षम करण्यास, आवश्यक आहे. असे सांगून त्याने जगातील ग्रंथांतून शंभर ग्रंथ निवडून त्याची यादी दिली होती. तरुण पिढीनी असे शंभर ग्रंथ विकत घेऊन वाचण्याचा निश्चय करावा. ◻

शरद गोगटे यांनी आखलेली व मराठी प्रकाशक परिषदेने आयोजित केलेली ही पुस्तक जत्रा व प्रदर्शन ३।१०।१९७९ पासून १०।१०।१९७९ पर्यंत पुण्यांत लक्ष्मीरोडवरील गोखले हॉलमध्ये सकाळ संध्याकाळ चालू होती. या जत्रेचा हेतु व उद्दिष्ट सांगण्यासाठी काढलेल्या पत्रिकेत उद्दिष्टे व हेतू सांगतांना म्हटले आहे– "ग्राहकांच्या नजरेला जास्तीत जास्त पुस्तके आणणे व विक्री करणे हा या जत्रेचा हेतू आहे. दसरा व दिवाळी या दरम्यानचा काळ या जत्रेसाठी निवडला त्याचे कारण सणाच्या निमित्ताने खरेदीचें वातावरण लोकांत असते. याच काळात ग्रंथाचे, ग्रंथ खरेदीचे महत्त्व लोकांच्या मनावर ठसविणे योग्य होईल. आपल्या इष्टमित्रांना व नातेवाईकांना भेटी व अहेर देण्याचे अनेक प्रसंग या काळात येतात. अशा वेळी ग्रंथ भेट ही सर्वोत्कृष्ट भेट आहे या विचारांचाही प्रचार व प्रसार करता येईल.

मराठी प्रकाशन परिषदेचे आजचे अध्यक्ष ह. अ. भावे (सरिता प्रकाशन) हे आहेत व कार्याध्यक्ष अनिरुद्ध प्रकाशनाचे गजाभाऊ क्षीरसागर आहेत. आज या परिषदेचे एकशे एक सभासद आहेत. ४ जुलै १९७७ रोजी प्रकाशक परिषदेची स्थापना झाली. प्रकाशकांच्या सामुदायिक अडचणीचे निवारण करणे, ग्रंथ प्रसार, ग्रंथ प्रदर्शने हे या संस्थेचे हेतू असून आजपर्यंत त्यांनी केलेल्या कार्यात चार प्रमुख गोष्टी सांगता येतील. (१) नॅशनल बुक ट्रस्टच्या सहकार्याने गेल्या दशकांतील मराठीतील ग्रंथ प्रकाशन हे चर्चासत्र घडवून आणले. (२) राजा राममोहन रॉय फौंडेशनच्या ग्रंथ खरेदीसाठी याद्या करून देऊन सहकार्य दिले. (३) सवलतीच्या कागदासाठी केंद्रीय मंत्र्याच्या भेटीगाठी व पत्रव्यवहार केला. (४) वैयक्तिक ग्रंथवाचक व खासगी वाचनालये यांच्या विस्तृत याद्या तयार केल्या.

गोखले हॉलमध्ये हा पुस्तक मेळावा भरला होता; त्याच्या दिनांक तीनला झालेल्या उद्घाटन समारंभाला अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र बँकेचे चेअरमन डॉ. वसंतराव पटवर्धन होते व उद्घाटक होत्या श्रीमती दुर्गाबाई भागवत. उद्घाटन करताना दुर्गाबाई यांनी दोन मुद्दे मांडले. एक सरकारने प्रकाशन व्यवसाय सोडून खासगी प्रकाशकांकडे द्यावा. दुसरा – प्रकाशन व्यवसायाचे जिल्हा पातळीपर्यंत विकेंद्रीकरण करावे. त्यांच्या या मुद्यांबद्दल मला एवढेच वाटले की दुर्गाबाईंचा सरकार या संस्थे-

वरचा रोष व खासगी प्रकाशकांवरचा विश्वास या दोहोत अतिरेक होतो आहे. सरकारी क्रमिक पुस्तके निघाल्यावर एका प्रकाशकाने मला म्हटले होते– ' सरकारने क्रमिक पुस्तके हाती घेतली हे फार उत्तम केले. सर्व दृष्टीनं सरकारने काढलेली पुस्तके सुंदर आहेत. आम्ही क्रमिक पुस्तकात जे काय करीत होतो ते आमचे आम्हालाच ठाऊक.'

सरकारी पुस्तके निघाल्यावर पालकांनाही ती आवडली. लेखकांच्या दृष्टीने तर ती गोष्ट फारच उत्तम झाली, कारण पाठ्यपुस्तक मंडळ प्रत्येक धडयास वर्षास राएल्टी देते. खासगी प्रकाशक पुस्तकात घेतलेल्या धडयास एकदा पंचवीस रुपये देत. मग ते पुस्तक कितीही वर्षे चालो. त्याच्या कितीही आवृत्ती निघोत. साधने सारखे साने गुरूजींचे प्रकाशकही हेच करीत. त्या काळात मी एका प्रकाशकाला म्हटले की आम्ही लेखक संघटना करू. धडा असा पंचवीस रुपयास देणार नाही. तेव्हा तो म्हणाला की ' तुमच्यावाचून अडणार नाही. आम्ही हक्क गेलेले लेखक घेऊ. आणि तुम्ही धडे दिले नाहीत तर कित्येक प्राध्यापक फुकटात धडे द्यायला तयार आहेत त्यांचे धडे घेऊ. ' मी म्हटले दर्जाचं काय ? ते मंजूर कसं होईल ?' तो म्हणाला, ' मंजुरीचा व दर्जाचा संबंध काय ?'

खासगी प्रकाशकांची प्रवृत्ती काय असू शकते याची कल्पना यावरून येईल. अर्थात सर्वच खासगी प्रकाशन वाईट आहेत असे मी म्हणणार नाही. ' मंगल वाचना'सारखी क्रमिक पुस्तके होतीच. दुर्गाबाईंच्या मुद्यातील अतिरेक दाखविण्यास मी हे सांगितले.

पुस्तकांची ही जत्रा सहा दिवस होती. त्यांत एकूण चौदा स्टॉल होते. गोखले हॉलमध्ये ते दाटीवाटीनं बसवले होते. व्यासपीठावर पुस्तकप्रदर्शन होते.

ज्यांना पुस्तकाची आवड असेल त्यांनी व आवड नसेल त्यांनीही ही जत्रा पहावी अशीच होती. ती पाहून निरक्षर माणूस साक्षर होण्याच्या मागे लागला असता. एकवेळ अशी होती की मराठीतून ज्ञान घ्यावयाचे तर ग्रंथ नव्हते. आता असा एखादाच विषय असेल. नॅशनल बुक ट्रस्टचे व महाराष्ट्र राज्याचे स्टॉल पाहून ही संपन्नता लक्षात येत होती व इतर प्रकाशकांचे स्टॉलही तोडीस तोड होते. या चौदा स्टॉल मधून फेरी मारताना, अरे ! या विषयावर पुस्तक आहे ? हे चरित्र मी कसे कधी पाहिले नाही ? असे सारखे मनात येत होते. प्रत्येक अभिरूचीच्या वाचकासाठी येथे पुस्तक होते. स्टॉलच्या बोळातून इतकी गर्दी होती की खेडेगावातील जत्रेत हिंडावे तशी गंमत वाटत होती. बोलण्यांचा गलबला लाऊडस्पीकरचा गोंगाट यामुळे अगदी घरगुती स्वरुप आले होते. मुले स्टॉलशी चिकटलेली दिसत होती. या ग्रंथांच्या विश्वांत लहान थोर सगळी समान झाली होती.

रोज एक साहित्यिक, खरेदी केलेल्या पुस्तकावर स्वाक्षरी देण्यासाठी निमंत्रित केला होता. पहिल्या दिवशी श्री. ज. जोशी यांनी स्वाक्षऱ्या दिल्या. दुसऱ्या दिवशी सौ. ज्योत्स्ना देवधर स्वाक्षऱ्यांसाठी आल्या होत्या. तिसऱ्या दिवशी मी स्वाक्षऱ्या दिल्या. आधीच्या दोघांच्या वेळचे मला ठाऊक नाही. मी स्वाक्षऱ्या देण्यासाठी संध्याकाळी सहाला हॉलमधे शिरताच लाउडस्पीकरून घोषणा सुरू झाली, ' तुमच्या सर्वांचे लाडके लेखक ' दि. बा. मोकाशी ' येथे आले आहेत. ते तुम्ही विकत घेतलेल्या पुस्तकावर स्वाक्षरी देतील. ' अधून मधून लाउडस्पीकर माझ्या पुस्तकाची यादी देत होता. अधून मधून एक नवा संकल्प–एक नवी योजना. दरमहिन्याला एक तरी पुस्तक घ्या ' हे सांगणे चालूच होते. ' तुमच्या सर्वांचे लाडके लेखक दि. बा. मोकाशी ' हे वाक्य वारंवार ऐकून खरे वाटू लागले होते. तसे वाटण्यास पूरक अशी गर्दीही वाढू लागली. आपल्यामुळेच ही गर्दी याविषयी मला शंका उरली नाही. मी भराभर स्वाक्षऱ्या देत होतो. मी बसलो होतो त्या दीडतासात मी तीनशे पुस्तकावर स्वाक्षऱ्या दिल्या. हा आकडा अवास्तव वाटत असेल तर दीडशे पुस्तकावर मी सह्या दिल्या असे धरावे. हाही आकडा पटत नसेल तर शंभर पुस्तकावर मी स्वाक्षऱ्या दिल्या. हे मान्य व्हावे. आणि हाही आकडा मान्य झाला नाहीं आणि कुणी मी फक्त पन्नास पुस्तकांवर स्वाक्षऱ्या दिल्या असे सिद्ध केले तरी मी स्वाक्षऱ्या दिलेले एकेक ग्रंथ ऐकाल तर थक्क व्हाल. अहो मी ज्ञानेश्वरीवर स्वाक्षरी दिली. स्वाक्षरी दिली त्याक्षणी ज्ञानेश्वरीचे मोठेपण माझ्या लक्षात आले. ज्ञानेश्वरीवर मी स्वाक्षरी देत असता नक्की ज्ञानेश्वर आकाशांतून कौतुकाने पहात उभे असतील. मौज प्रकाशनचे व सत्यकथेचे श्री. पु. भागवत यांनी माझी स्वाक्षरी घेतली हें सांगितल्यावर तर कांहीच्या अंगावर मत्सराचे शहारे येतील. आणि श्री. पु. यांनी घेतलेला ग्रंथ तरी कोणता होता ! मॉलिअरचा विख्यात शब्दकोश, तीन इंच जाडीचा. त्यावर साक्षरी देताना काय वाटले असेल कल्पना करा. स्वाक्षरी देऊन मी मान वर करून पाहिलं, टी. व्ही. चे लोक आले होते.

गर्दी वाढतच होती. दीड तासानंतर स्वाक्षऱ्या देणं बंद करून मी गर्दीतून बाहेर आलो. तिथे कोपर्डेकर, फडणीस, भावे, इनामदार, वगैरे परिषदेचे कार्यकर्ते होते. मग त्यांच्याबरोबर स्टॉल पहाण्यास आत गेलो. स्टॉलच्या लोकांशी बोलताना कळले की इतर दिवशी जिथे तीनशे विक्री झाली तिथे आज बाराशे झाली होती. पुढे मला कळले की एकूण सहा दिवसांत सहा हजार तिकीटे खपली. त्यांतली मी स्वाक्षरी दिली त्या रविवारच्या दिवशी बाराशे तिकीटे संपली होती. एकूण सर्व स्टॉलचा गल्ला रु. ४०,००० झाला. या जत्रेत माहितीपर तांत्रिक, चरित्रे, इतिहास अशा विषयांवरची पुस्तके जास्त खपली कथा कादंबऱ्या सर्वात कमी खपल्या. तसेच दहा रुपये किंमतीच्या आतली पुस्तके जास्त गेली.

□

स्टॉल पाहून आम्ही चहापिण्यास बाहेर बसलो. तेव्हा स्वत:वर खूष होतो. तेवढ्यात एक प्रकाशक म्हणाला, ' आज रविवार ना? आज गर्दी अपेक्षित होतीच.

जत्रा संपल्यावर काही दिवसांनी जत्रेत भाग न घेतलेल्या एका प्रकाशकाने हिशेब करून सांगितले कीं ही जत्रा, जत्रा काढण्यासाठी फायदेशीर झाली नाही. सर्वांना थोडा थोडा तोटाच आला असावा.

ही जत्रा फायद्यात न येण्याची म्हणजेच आपल्या देशांतील कमी पुस्तक विक्रीची मीमांसा अध्यक्ष डॉ. वसंत पटवर्धन यांनी केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, ' आपल्या देशात वर्षाला पस्तीस कोटी पुस्तकेही खपत नाहीत. म्हणजे वर्षास माणशी एक पुस्तकही खपत नाही. ही स्थिती बदलून विक्री वाढावी म्हणून त्यांनी सुचविले कीं ठराविक रकमेच्या पुस्तक खरेदीवर विक्री कर माफ असावा. कांहीं वर्षांपूर्वी ५०० रु. पर्यंत हा कर माफ होता. आता वाढलेली महागाई लक्षात घेऊन पाच हजार किमतीच्या पुस्तक खरेदीपर्यंत कर माफी असावी. '

पुस्तकांची ही स्थिती लक्षात घेऊन प्रदर्शनात स्पीकरवरून चाललेल्या घोषणेप्रमाणे सर्वजण नवा संकल्प करतील व ज्ञानार्जन मनोरंजन यासाठी महिन्याला एक तरी पुस्तक विकत घेतील अशी मी आशा करतो.

□

१९२७ साली महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह करण्यासाठी दलित समाज डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने एकत्रित आलेला होता. पण विचारान्ती डॉक्टर आंबेडकर यांनी सत्याग्रहाचे उचललेले पाऊल मागे घेतले.

मराठवाडा विद्यापीठ नामांतरानिमित्तही पुन्हा असा एक अटीतटीचा प्रसंग उभा राहिलेला आहे.

त्यानिमित्त इतिहासाची ही एक उजळणी.

'माणूस' कचेरीत नेहमी येणारे श्री. बापूसाहेब राजभोज यांना प्रा. रा. म. बिवलकर यांनी एकदा या '२७ च्या ऐतिहासिक प्रसंगावर बोलते केले.

तो हा सारा वृत्तान्त.

# चवदार तळ्याचा सत्याग्रह : नेमके काय घडले ?

श्री. बापूसाहेब राजभोज

प्रतिवर्षी मार्च महिना जवळ आला की, कुणी ना कुणी रोज दारी-धरणे धरतो. साऱ्यांची मागणी एकच 'बापूसाहेब, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ साली महाडला मुक्तिसंग्रामाची जी मुहूर्तमेढ रोवली, त्या घटनेचे तुम्ही नुसते साक्षीदार नव्हे, तर थोड्याफार प्रमाणात शिल्पकारही. त्यामुळे महाडच्या मुक्तिसंग्रामाविषयी तुम्ही आम्हाला लेख द्या–' मी म्हणतो, 'अरे बाबांनो, मी आपला वेडाबागडा गरीब माणूस जे पटले, जे योग्य वाटले, ते करीत सुटणारा, मग अपमानाची पर्वा नाही, मानहानीला दाद नाही, तुरुंगवासाची भीती नाही. मी जन्मभर सैनिक राहिलो. सेनानी व्हायची महत्त्वाकांक्षाही धरली नाही. जे घडले ते जसे आठवेल तसे सांगतो. लेख वगैरे लिहिण्याची आपली ताकद नाही. लिखापढीची आम्हाला संवयही नाही.

'तुम्ही सांगा, आम्ही लिहून घेतो,' मी म्हणतो (बिवलकर)

'विचारा, म्हणजे सांगतो. पण मला काही विचारायचे तर दलित मुक्तिसंग्रामांची विचारणाऱ्याला माहिती हवी.अभ्यास हवा. नाहीतर विचारणार काय कपाळ !'

: १९२७ साली मार्च १९, २० तारखांना महाडला कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद भरणार आहे आणि त्याचे अध्यक्षपद बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकर भूषविणार आहेत असे कळल्यावर त्या परिषदेला हजर राहायचे मला वेध लागले. मी जातीने चांभार. मूळचा नाशिक जिल्ह्यात राहणारा. पण पुण्यात गेलो आणि कै. माटे मास्तरांच्या संस्कारात वाढलो. त्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यात मी मनापासून सामील झालो होतो. पण अस्पृश्य मंडळींना स्वजातीय नेतृत्वाचा लाभ झाल्यावाचून अस्पृश्येतरांचे अस्पृश्योद्धाराचे प्रयत्न म्हणजे रोगावरील फक्त मलमपट्ट्या ठरतील, रोगनिर्मूलन त्यातून व्हायचे नाही, अशी माझी धारणा बनत होती. डॉ. आंबेडकरांची भाषणे त्यापूर्वी ऐकली होती. वाचली होती. आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे मी आकर्षिला गेलो होतो. शिवाय १९२४ साली डॉक्टरसाहेबांनी मुंबईत स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेचा चिटणीस सीताराम नामदेव शिवतरकर हा चर्मकार समाजातीलच होता. महाडचा भानुदास गुंडोजी कांवळे हा आमचा ज्ञातीबांधवही महाडच्या परिषदेशी संबंधित होता. म्हणजे डॉक्टरांनी सुरू केलेला मुक्तिसंग्राम मूलतः तरी अखिल दलितांच्या मुक्तीचा लढा होता. म्हणून मी १९ मार्चच्या आदल्या रात्री महाडला हजर झालो. भानुदास कांवळे यांनी माझे प्रेमाने स्वागत केले.

: १९–२० मार्च रोजी श्री. वीरेश्वर मंदिराच्या तळ्यापलीकडे गाडीतळावर उभारलेल्या श्री. वीरेश्वर थिएटरात बहिष्कृतांची ती परिषद भरली. डॉक्टर बाबासाहेबांचे परिषदेपुढे झालेले ते अस्खलित अध्यक्षीय भाषण आजही कानात रुंजते आहे. 'आचार, विचार आणि उच्चार यांची शुद्धी जोपर्यंत झाली नाही तोपर्यंत अस्पृश्य समाजात जागृतीचे अगर प्रगतीचे बी कधीही रुजणार नाही. हल्लीच्या स्थितीत त्यांच्या खडकाळ मनावर कसलेही नवे रोप उगवणार नाही. आपली मने सुसंस्कृत होण्यासाठी त्यांनी पांढरपेशाचा अवलंब केला पाहिजे. माणसे म्हणून जगायला शिका. माणसे म्हणूनच वागायला शिका. शिळ्या भाकरीच्या तुकड्यासाठी आपली माणुसकी विकू नका. जागृतीचा विस्तव तुम्ही कधीही विझू देता कामा नये .या जागृतीच्या कामात, लष्करातील पेन्शनर मंडळींनी पुढाकार घ्यायला हवा. आपल्या मंडळींना मार्गदर्शन करायला हवे.

स्वजनोद्धाराच्या कार्यात ही मंडळी पुढाकार घेतील अशी मला आशा आहे.'

: आज विचार करतो तेव्हा मनात येते, ५२ वर्षांपूर्वी चवदार तळ्याच्या काठावर डॉक्टर आंबेडकरांनी काढलेले हे उद्गार हवेतच विरले का? दलितांमधील जाणत्यांच्या कानांच्या पाळघात ते शिरले नाहीत का? नसावेत. कारण तसे झाले असते तर त्यानंतर पाणीबंदी तोडण्यासाठी गावोगावच्या पाणवठ्यावर संग्राम उभे राहिले असते. एक गाव एक पाणवठा, एक गाव एक मसणवटा, एक उंबरठा निर्माण करण्यासाठी पुढाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी घोर लढा दिला असता. डॉक्टरांना हवा असलेला एकवर्णीय समाज निर्माण झाला असता. भाषा, भूषा, भोजन, भवन, जाती–पाती–पंथ साऱ्या भिंती मोडून पडल्या असत्या. डॉक्टरसाहेबांनी झगडून-झगडून घटनेच्या कलमांद्वारे मिळवून दिलेले अधिकार, सोयी-सवलती मिळण्यासाठी वा मिळवण्यासाठी आजही झगडत राहायची पाळी आली नसती. दलितोद्धारांच्या चळवळीत सामुदायिक प्रतिष्ठेपेक्षा वैयक्तिक प्रतिष्ठेला महत्त्व आले. राजकीय आणि वैयक्तिक स्वार्थ आडवे आले. जे शिकले, ज्यांना सल्ला मिळाला, ज्यांना प्रतिष्ठा मिळाली ते बामण बनले. त्यांना खेडोपाडी कुजत पडलेल्या आपल्या भावांची–बहिणींची आठवण व्हावी कशी? त्यांच्यावर अत्याचार झाले, त्यांची घरे जाळली गेली, त्यांची अब्रू लुटली गेली, तर त्यांचे राजकीय भांडवल करण्यापुरतेच त्यांना या गोष्टींचे सोयरसुतक! अहो, पोटासाठी सारी ढोंगे तिथे कैसा पांडुरंग! अस्पृश्यता अजूनही मेलीच नाही.

## ठरावाची अंमलबजावणी

: श्री वीरेश्वर थिएटरातल्या त्या परिषदेत कितीतरी ठराव पास झाले. त्यावर अस्पृश्यांप्रमाणेच अनेक स्पृश्यांचीही भाषणे झाली. भानुदास कांबळे जसा बोलला तसे मीही त्या परिषदेत आपले विचार मांडले. दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्चला सकाळपासून परिषदेचे अधिवेशन सुरू झाले. कारण दुपारपर्यंत परिषद संपवून खेड्यापाड्यांतून परिषदेकरता आलेल्या २–३ हजार मंडळींना सूर्यास्तापर्यंत आपले घर हे गाठता यावे अशी कल्पना होती. दुपारी बारा वाजता भाई अनंतराव चित्रे आभार प्रदर्शनाचा ठराव मांडायला उठले. म्हणाले–'ही परिषद नुसते ठराव करून संपावी असे मला वाटत नाही. तेवीस सालच्या रा. ब. बोल्यांच्या मुंबई विधानसभेतील प्रस्तावाची अंमलबजावणी करून महाडचे नगराध्यक्ष श्री. सुरबानाना टिपणीस यांनी २४ सालीच महाडच्या नगरपालिकेच्या हद्दीतील सर्व पाणवठे सर्वांसाठी खुले केले आहेत; पण आजवर अस्पृश्य मंडळींनी त्यांना नगरपालिकेचे दिलेले अधिकार वापरलेले नाहीत. आता दुपार झाली आहे. सर्वांना तहानही लागली आहे. तेव्हा आपल्या अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली आपण सारे चवदार तळ्यावर जाऊन ते पाणी पोटभर पिऊ या.' आम्हा साऱ्यांनाच ती कल्पना आवडली. त्या वेळी ही कल्पना भाई चित्र्यांना आयत्या वेळी सुचली असे साऱ्यांनाच वाटले; पण ती सूचना आयत्यावेळी पुढे आणण्याचे नेतेमंडळीत आधीच ठरले होते.

: सारी सभा उभी राहिली. डॉक्टरांच्या नेतृत्वाखाली चवदार तळ्यावर गेली. तिथले पाणी सारी मंडळी पोटभर प्याली. काही मंडळी जेवणासाठी सभामंडपाकडे परतली. काही पेठेत पांगली. मी भाकरी खायला भानुदासकडे गेलो. गप्पाटप्पा करीत भाकरी संपत होती. चवदार तळ्याचे पाणी २–३ हजार अस्पृश्य मंडळी सर्वांसमक्ष प्याली. तरी स्पृश्यांनी 'ब्र'ही काढला नाही. याचे अस्पृश्यांना आश्चर्य वाटत होते. तोच मंडपावर हल्ला झाल्याची, अनेकांना पकडल्याची, पेठेतही हुल्लड चालू असल्याची बातमी आली. काय होतेय याची आम्ही चौकशी करण्याआधीच काठ्या सोटे घेऊन काही मंडळी भानुदासच्या दुकानी ठेपली. त्यांनी भानुदासाला 'परिषदेत कां बोललास?' असे विचारले. तो काही उत्तर देण्याआधी त्याच्यावर काठ्या पडल्या, मला तेथे पाहून 'हांही चांभारडा होता भाषण करायला' असे कुणी तरी म्हणाले. आणि माझ्या डोक्यावर पहिली काठी लागली गेली. मला आणि भानुदासला वाचवायला त्याची बायको मध्ये पडली तर तिलाही त्या हरामखोरांनी लाथाबुक्क्यांनी बडवली. त्या माउलीने एक गोधडी माझ्याकडे फेकली. त्यामुळे काठ्यांपासून माझे बरेच संरक्षण झाले. 'मागच्या मागे तुम्ही भावोजी,' असे ती म्हणाली आणि मी तिची आज्ञा शिरसावंद्य मानून पळालो. मोत्रेकरांच्या हॉटेलात आमची मंडळी होती. माझे डोके फुटून त्यातून रक्त वाहत आहे असे पाहून ती माझ्याकडे धावली, मी त्यांना म्हटले 'माझी काळजी नको. मी मेलो तरी हरकत नाही. डाक बंगल्यावर डॉक्टर उतरले आहेत त्यांच्या संरक्षणाचे बघा तुम्ही.'

: तेवढ्यात गावभर आवई उठली. 'महारानी चवदार तळे बाटवले. आता ते श्रीवीरेश्वराचे देऊळ बाटवणार आहेत.' आमचा तसला विचार तेव्हा नव्हता. पण मंदिर प्रवेशाचा प्रश्न आम्ही पुढे जो धसास लावला त्याचे बीज आवईने टाकले होते असे म्हणायास हवे.

: आम्ही डाक बंगल्याच्या दिशेने जायला निघालो. आमचा परिषद मंडप उद्ध्वस्त झाला होता. विकत घेऊन साठविलेले पाणी, भात कालविण्याची गाडगीमडकी मातीत मिसळून गेली होती. श्री वीरेश्वर मंदिरात आणि त्याच्या आवारात हजारो स्पृश्य मंडळी काठ्या, सोटे, भाले घेऊन श्रीवीरेश्वराच्या रक्षणासाठी जमली होती. त्यांचा आरडाओरडा ऐकून आमच्या मनात डॉक्टरांच्या सुरक्षिततेसंबंधी काळजी धपापत होती. तोच डॉक्टर मंदिराकडे येत असताना दिसले. त्यांनी फौजदाराला आणि जमलेल्या स्पृश्य मंडळींना 'आमचा देऊळ बाटविण्याचा मुळीच विचार नाही' असे स्पष्ट शब्दात सांगितले. दंगलीत मार पडलेल्यांची चौकशी करून त्यांना मलमपट्ट्या करण्यासाठी सरकारी दवाखान्यात नेण्याची त्यांनी कार्यकर्त्यांना आज्ञा दिली. आणि मारणाऱ्यांविरुद्ध पोलीस चौकशी तक्रारी नोंदविण्याच्या कामाला ते लागले. मीही माझी तक्रार नोंदविली. मार खाऊन अशी तक्रार नोंदवायला किती तरी घाबरत होते. त्यांना तयार करण्यात माझे आणखी एकदोन दिवस महाडात मोडले. भानुदास तर फार घाबरला होता. 'मला या गावात रहायचे आहे. तक्रार नोंदवून काय करू' असे तो म्हणत होता मी राहिल्याने त्यांना थोडासा दिलासा मिळाला.

: पुढे अलीबागच्या कोर्टात हे फौजदारी खटले चालले, त्यात

साक्ष देण्यासाठी एकदोन खेपा अलीबागला घालाव्या लागल्या. खटला डॉक्टरच चालवीत होते. माझ्या साक्षीमुळे मारहाण करणाऱ्यांना चार चार महिने सक्तमजुरी लावण्यास फार मदत झाली. माझी साक्ष झाली त्या दिवशी डॉक्टरसाहेबांनी माझ्या पाठीवर शाबास-कीची थाप मारली. त्या वेळी अंगावर उठलेल्या गोड झिणझिण्या आता हे सांगतानाही माझ्या अंगावर उठत आहेत.

: २२ मार्च १९२७ नंतर ८–१५ दिवसातच चवदार तळयाच्या पाळी राहणाऱ्या ब्राह्मण मंडळींनी गाईच्या शेणामुताच्या, दह्यादुधाच्या घागरी ओतून ते तळे शुद्ध करून घेतले. गाई-गुरे, कुत्री, मांजरे ज्या तळ्याचे पाणी प्यायली तरी जे तळे बाटत नव्हते, मुसलमानांनी तेथून पाणी घेतले तरी चालत होते, ते तळे आमच्या स्पर्शाने, आम्ही हिंदू एकधर्मीय माणसे असूनही बाटले होते. ही घटना आम्हा सर्वांच्याच मनाला फार लागली. डॉक्टरसाहेब तर अगदी बेचैन झाले. 'बहिष्कृत भारतातून ते आपल्यावरील टीकेचा समाचार घेत होते. त्यातून या घटनेचा त्यांनी कडाडून निषेध केला. त्यात महाडच्या नगरपालिकेने नगरपालिकेच्या हद्दीतील सर्व पाणवठे सर्वांना खुले केल्याचा २४ सालचा ठराव मागे घेतला, त्याबद्दलचाही निषेध होता. या साऱ्या अन्यायाविरुद्ध 'सत्याग्रह' करण्याचा निर्णय डॉक्टर बाबासाहेबांनी घेतला. त्यांनी लिहिले–

## सत्याग्रहाचे अस्त्र उपसले

"प्रतिकाराची पहिली आघाडी आपण महाडला उघडली. तिथे प्रस्थापित केलेला समतेचा हक्क सोवळ्या भटजींनी चवदार तळ्याचे शुद्धीकरण करून पुसून टाकला आहे. मुसलमानासारखे भक्षक तळ्यात उतरले तरी जे पाणी भ्रष्ट होत नाही, गाई-गुरे, इतर पशुपक्षी तळ्याला शिवले तरी जे पाणी अशुद्ध होत नाही, ते तुमच्या आमच्या स्पर्शाने विटाळले म्हणून गोमूत्र आणि गाईची विष्ठा तळ्यात कालवून पाणी शुद्ध करणाऱ्या महाडच्या शिष्टांनी, तुम्हा आम्हांना पशूहून नीच लेखून, तुमचा आमचा भयंकर अपमान केला आहे. त्याबद्दल बदला घ्यायचा तर आपल्याला प्रचंड संख्येने पुन्हा महाडला जमून आपली समान हक्काची वहिवाट प्रस्थापित करण्यासाठी सत्याग्रह करायला हवा."

डॉक्टरांच्या सत्याग्रहाच्या आवाहनाला साऱ्या महाराष्ट्रातूनच नव्हे तर साऱ्या भारतातून विलक्षण उमदा प्रतिसाद मिळाला. दि. २५, २६, २७ डिसेंबर १९२७ या सत्याग्रहाच्या तारखा जाहीर झाल्या. त्यासाठी ठिकठिकाणी सभा प्रचार करून आम्ही पैसे गोळा केले. २४ डिसेंबरच्या रात्रीपर्यंत चवदार तळ्याजवळच्या महार-वाड्याजवळच्या, फत्तेखान देशमुखांच्या शेतात उभारलेल्या भव्य मंडपात दहा हजारावर दलित मंडळी सत्याग्रहासाठी हजर झाली होती. सत्याग्रह परिषदेच्या संयोजकांना महाडकर स्पृश्य मंडळींच्या भयंकर असहकाराला तोंड द्यावे लागले होते.

आम्ही महाडला पोहोचलो तो आम्हाला एक वाईट बातमी समजली. दि. ७–१२–२७ रोजी नागरिकांची सभा घेऊन कुलाबा जिल्ह्याचे कलेक्टर श्री. हुड यांनी एक डाव खेळला होता. 'चवदार तळे हे सार्वजनिक नसून खाजगी आहे' असा दावा जर कुणी कोर्टात उभा केला तर त्या प्रश्नाची तड लागेपर्यंत अस्पृश्यांना तळ्यावर जायला बंदी करणे सरकारला क्रमप्राप्त होईल, असा त्यांनी साळसूदपणाचा पवित्रा घेतला. त्याप्रमाणे महाडकर स्पृश्य मंडळींनी महाडच्या कोर्टात चवदार तळे खाजगी असल्याचा व त्यामुळे २५–२६ डिसेंबरला डॉक्टर आंबेडकर व त्यांच्या अनुयायांना तळ्याचे पाणी घेण्यास बंदी व्हावी असा दावा दि. १२–१२–२७ रोजी दाखल केला होता. दि. १४ डिसेंबरला दावा ऐकून महाडच्या मुन्सफांनी अस्पृश्यांना या दाव्याचा निकाल लागेपर्यंत तळ्यावर जाण्यास तात्पुरती बंदी केल्याचा हुकूम दिला होता.

'सत्याग्रह परिषद २५ डिसेंबरला (१९२७) सकाळपासूनच सुरू व्हायची होती. त्यासाठी डॉक्टर मुंबईची कार्यकर्ती मंडळी २४–१२ ला बोटीने निघून महाडला पोचायची होती, पण डॉक्टरांची बोट दासगाव बंदरात यायला, २५–१२ ची दुपार झाली. तिथून डी. एस. पी, फॅरण्ट साहेबांनी त्यांना व श्री. बापूसाहेब सहस्रबुद्धे यांना गाडीत घातले आणि तडक महाडच्या डाक बंगल्या-वर कलेक्टर हुड साहेबांच्या भेटीला नेले. दासगावहून डॉक्टरांना मिरवणुकीने आणायला गेलेली चार पाच हजार मंडळी भर दुपारी नाचत, गाणे गात, लेझीम खेळत दोन वाजेपर्यंत सभा मंडपात पोहोचली. डॉक्टर व बापूसाहेब सहस्रबुद्धे तीन वाजता हुड साहेबां-कडून परतले. साहेबाने डॉक्टरांना कोर्टाचा हुकूम मोडू नका, चवदार तळ्यावर जाऊ नका, तिथे १४४ कलम पुकारले आहे, इत्यादी गोष्टी सुनावल्या होत्या.

## मनुस्मृतीचे दहन

: चार वाजता परिषद सुरू झाली. डॉक्टरांनी आपल्या भाषणात समानतेचा पुरस्कार करताना सांगितले. 'चातुर्वर्ण व्यवस्था ही लोक विग्रहकारी व्यवस्था आहे. तर एकवर्णी व्यवस्था ही लोकसंग्रहकारी आहे. चातुर्वर्णीय व्यवस्थेने हिंदुधर्मात व्यक्तीचा विकास खुंटविणारी असमानता आणली आहे. त्यामुळे हा समाज दुबळा व विस्कळीत झाला आहे. तो समर्थ आणि विजिगीषु करण्यासाठी चातुर्वर्ण्याची चौकट मोडून टाकली पाहिजे. एकवर्ण व समता या दोन तत्त्वांवर समाजाची नवी जडणघडण केली पाहिजे. हे कार्य समाजक्रान्तीचे आहे. ती शांततेने व्हावी अशी आमची इच्छा आहे. पण स्पृश्यांची इच्छा तशी दिसत नाही. त्यांनी चवदार तळ्याभोवती पोलिसांच्या पलटणी उभ्या केल्या आहेत. आपला लढा समतेचा व समतेसाठी आहे. चवदार तळ्याचे पाणी आपण प्यालो नाही म्हणून आपण मरणार नाही पण तो आमचा हक्क आहे." डॉक्टरांची कितीतरी वाक्ये अक्षरवाङ्मयात जमा करण्यासारखी होती. सभेत त्या दिवशी चार ठराव पास झाले. हिंदुमात्राच्या जन्मसिद्ध हक्कांचा जाहीरनामा एका ठरावात होता. दुसरा ठराव, शूद्राचा उपमर्द करणाऱ्या, त्यांची प्रगती खुंटविणाऱ्या त्यांना सामाजिक आर्थिक गुलामगिरीत दडप-णाऱ्या मनुस्मृती नामक ग्रंथाचे जाहीर दहन करावे अशा अर्थाचा होता, तो बापूसाहेब सहस्रबुद्धे यांनी मांडला. मी आणि श्री. थोरातांनी त्याला जोरदार अनुमोदन देणारी भाषणे केली, इतकेच नव्हे तर रात्री सभा संपताना मंडपाच्या दारी श्री. अनंतराव चित्रे यांनी बांधून घेतलेल्या यज्ञवेदीमध्ये श्री. सहस्रबुद्धे यांच्या हस्ते

मनुस्मृती पानापानांनी जाळलीही. अस्पृश्यांवर युगानुयुगे अन्याय करणाऱ्या त्या ग्रंथाची ती होळीही डॉक्टरांनी प्रेतवत पडलेल्या अस्पृश्य समाजात प्राण फुंकल्याची ग्वाही होती.

: हिंदू धर्मातील वर्णविषयक संज्ञानी एकमेकाला ओळखण्यास कायद्याने बंदी करावी अशी मागणी करणारा तिसरा ठराव होता. धर्माधिकारी ही संस्था लोकमतानुवर्ती आणि लोकनियुक्त असावी अशी मागणी करणारा चौथा ठराव होता.

: मुंबईहून भांडी न आल्याने त्या रात्री चणे-कुरमुरे खाऊन व पोटभर पाणी पिऊनच अंथरुणावर अंगे टाकली. २६–१२–२७ रोजी सकाळी साडेनऊ वाजता परिषदेचे काम पुन्हा सुरू झाले. त्या दिवशी सत्याग्रहासंबंधी चर्चा झाली. सत्याग्रह करावा असा ठराव खुद्द डॉक्टरांनीच मांडला. ठरावावर उलटसुलट भाषणे झाली. पण सारी मंडळी सत्याग्रहासाठी उत्सुक दिसली. सत्याग्रह केल्यास तुरुंगात जायला व हालअपेष्टा भोगायला कितीजण तयार आहेत हे अजमावण्याचे ठरले, तर अवघ्या तासा-दीड तासात ३,८८४ लोकांनी प्रतिज्ञा-पत्रकावर सह्या केल्या. सह्या करू इच्छिणाऱ्यांची रांग तरीही हटत नव्हती, तेव्हा आम्हीच ती नोंदणी थांबविली. हजारो दबलेली, दडपलेली मंडळी एवढ्या मोठ्या संख्येने सत्याग्रहाला तयार झाल्याचे पाहून डॉक्टरांनाही आश्चर्य वाटले पण ते विचारात पडले होते. त्या सायंकाळी श्री. हुड यांनी परिषदेस हजर राहून भाषण केले व सत्याग्रह न करण्याची विनंती साऱ्यांना केली. तरी साऱ्या मंडळींचे मत सत्याग्रह करावा असेच होते. रात्री डॉक्टरांच्या निवासस्थानी–यावेळी डॉक्टर महारवाड्यातच एका घरात उतरले होते–आम्हा काही मंडळींची बैठक झाली. श्री. भाऊराव गायकवाड यांनीसुद्धा आम्ही सगळ्यांनी सत्याग्रह झालाच पाहिजे असा हट्ट धरला होता. डॉक्टर साऱ्यांचेच ऐकून घेत होते. पण स्वतः काहीच मत देत नव्हते. ' आम्ही एवढे बोलतो आहोत पण बाबासाहेब आपण आपले काहीच मत सांगत नाहीत ' असे भाऊराव म्हणाले. भाऊराव म्हणजे नाशिकचे कर्मवीर दादासाहेब गायकवाड. तेव्हा डॉक्टर म्हणाले, ' मी सत्याग्रह करावा याच मताचा आहे पण प्रतिपक्षाने टाकलेला डाव बिनतोड आहे. एकाचवेळी नव्याने जागृत झालेल्या आपल्या समाजाला स्पृश्यांविरुद्ध आणि सरकारविरोधात झगडता येणार नाही. त्यामुळे विचारांती हा सत्याग्रह स्थगित करावा असे माझे मन मला सांगते. ' डॉक्टरांचे मत ऐकून आम्ही सारेच अवाक झालो. सत्याग्रह करण्यासाठी इथे हजारो मंडळी जमली होती. त्यांनी प्रतिज्ञापत्रावर सह्या केल्या होत्या. सारे सत्याग्रहासाठी आसुसले होते आणि डॉक्टर सत्याग्रह स्थगितीची भाषा बोलत होते.

## सत्याग्रहाऐवजी मिरवणूक

: पण डॉक्टरांनी आपले म्हणणे खरे केले. २७–१२ला सकाळच्या अधिवेशनात सत्याग्रह स्थगित करण्याचा ठराव त्यांनीच मांडला. सारी मंडळी व्यथित झाली, पण आपल्या नेत्याचा शब्द त्यांनी मानला. चारा-चारांच्या रांगेने चवदार तळ्यासभोवती फेरी घालून गावातून त्यांनी जंगी मिरवणूक काढली आणि सत्याग्रह परिषद सत्याग्रह न करताच समाप्त झाली. त्या दिवशी दलितोद्धार कार्यात चर्मकार मंडळींनी सहभागी व्हावे म्हणून डॉक्टरांची एक सभा आम्ही चांभार वाड्यातही भरविली होती. डॉक्टरांनी स्वच्छ शब्दात या समाजक्रांतीच्या कार्यात खांद्याला खांदा भिडविण्याचे आव्हान चर्मकार बंधूंनाही केले.

: महाडच्या दोन्ही परिषदांमुळे डॉक्टरसाहेबांशी माझा घनिष्ट संबंध आला. पुढच्याच वर्षी माटेमास्तरांच्याबरोबर मी पर्वतीच्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहात उतरलो. श्री. शिवराम ग्यानबा कांबळे हे या सत्याग्रह समितीचे अध्यक्ष होते. श्री. विनायकराव भुरकुटे सेक्रेटरी होते. तर मी जनरल सेक्रेटरी होतो. पुण्याची पुष्कळ पुरोगामी ब्राह्मण मंडळीही आमच्या साथीला होती. त्या सत्याग्रहापायीही मी मार खाल्ला. १९३० साली डॉक्टरसाहेबांनी व दादासाहेब गायकवाड यांनी नाशिक मंदिरप्रवेश सत्याग्रह सुरू केला. तिथे हा खंदा सैनिक, सत्याग्रह करायला, धरणे धरायला हजर होता. जेलही भोगला त्यापायी.

## माझा प्रवास

: डॉक्टरसाहेबांच्या पक्षात मी सातत्याने राहिलो नाही. कधी हिंदुमहासभेच्या कार्यकारिणीवर जाण्यापर्यंत त्या पक्षात उमेदवारी केली तर कधी महात्मा गांधींच्या आश्रमात खादी पेहनून, मैल्याच्या कुंड्याही उचलल्या आणि चरख्याचे चाकही फिरविले, पण दलितांवरील अन्याय दूर करण्याच्या एकाही चळवळीपासून मी कधी दूर राहिलो नाही. त्यामुळेच डॉक्टरांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन स्थापन केली. त्या संस्थेचा सतत चौदा वर्षे मी चिटणीस होतो. मी महात्मा गांधींच्या आश्रमात होतो. त्यांच्या तत्त्वज्ञानाची व अस्पृश्यता निवारणाची तळी उचलीत होतो. तेव्हाही मी डॉक्टरांना मनोमन मानीत होतो. बाहेर त्यांना शिव्याही मोजीत होतो. पण मनात देव म्हणूनही पूजित होतो. तेव्हा मला तोंडावर तेही शिव्या घालायचे. डॉक्टरांच्या जवळची काही मंडळी म्हणायची, ' बाबासाहेब, हा लुच्चा माणूस गांधींच्या गोटातला आहे. तुम्हाला येता-जाता शिव्या घालतो, तुम्ही त्याला आपल्याकडे येऊ तरी का देता ? ' त्यावर डॉक्टर काय म्हणायचे ? ' राजभोज कसाही असो. गांधींच्या नादी लागून काँग्रेसवाला बनला आहे तरी पण खादीचे कपडे घालून हा इथे येतो आणि मला हार घालतो. राजभोज कुठेही असला तरी तो माझा माणूस आहे, हे लक्षात ठेवा. '

: मी काँग्रेसमध्ये राहिलो तरी बाबांच्या कृपेनेच १९५२ ते ६४ या काळात खासदारही झालो. जगातले पाच-पंचवीस देश, तिथली परिस्थिती पहाण्याची संधी मला मिळाली. १९७४ पासून महाराष्ट्र विधान परिषदेचा मी आमदारही आहे. पूर्वी काँग्रेसवाला म्हणून, आता जनतावाला म्हणून, पण दलितांच्या हक्कांची पायमल्ली, अन्याय, अत्याचार यांना जे जे व्यासपीठ मिळेल त्यावरून मी वाचा फोडीत राहिलो आहे. डॉक्टरसाहेबांची इच्छा म्हणून १९५७ साली बॅन्कॉकच्या परिषदेत बौद्ध धर्मही स्वीकारला आहे. माझे डॉक्टरांशी धर्मांतरावरून, स्वतंत्र मतदार संघावरून मतभेद जरूर झाले पण त्यामुळे संबंध दुरावले नाहीत. मित्रहो, आज वयाच्या पंचाहत्तरीला पोहोचलेल्या पां. ना. राजभोज जगाला आवर्जून सांगतो, ' मी डॉक्टर आंबेडकरांचा सच्चा पाईक आहे. त्यांच्या चळवळीत भाग घेणारा, त्या चळवळींना वळण देणारा मी माणूस आहे. एकवर्णी समाज आम्ही आजवर निर्माण करू शकलो नाही, याबद्दल मला खंत आहे. त्यासाठी मोर्चे, निदर्शने, उपोषणे, धरणे, घेराव, काहीही करायला मी या वयातही तयार आहे. डॉक्टरांचे स्वप्न साकार झालेले त्यांना पहायला मिळाले नाही पण मला मिळावे अशी इच्छा आहे. पाहू या. जयहिंद...जयभीम. '

**संपूर्ण ईशान्य भारत आज पेटलेला आहे. भारतात हा भाग राहतो की जातो अशी अवस्था आहे. तिकडे जाणेयेणेही खर्चाचे व जिकिरीचे. निदान ही थोडी तोंडओळख तर करून घेऊ!**

**लेखक व्यवसायानिमित्त गेल्या दोन-तीन वर्षांपासून शिलाँगलाच असतात.**

# ईशान्य भारताची तोंडओळख

दत्तात्रय नारायण जोशी

आपला भारत खंडप्राय व आवाढव्य देश आहे. साधारणत: आपण कलकत्ता हा भाग पूर्वेकडचा सीमाप्रदेश म्हणून ओळखतो. त्याच्या उत्तरपूर्वेला देशाचा खूप मोठा भाग आहे हे विशेष कुणाला ठाऊक नसते. कलकत्त्याहून रेल्वे गाडीने २२ तास प्रवास केल्यावर गोहाटीला पोचता येते. गोहाटी ही आसाम राज्याची राजधानी व या भागातले मोठे शहर. येथून थेट पूर्वेकडे ५०० मैल गेले की देशाची सीमा येते. या भागात जवळजवळ अडीच लाख वर्ग किलोमीटर (ऐंशी हजार वर्ग मैल) भूप्रदेश आहे. भाग खूप मागासलेला, दळणवळणाची साधने कमी, पण रम्य निसर्ग व विविध प्रकारचे लोक राहात असलेला आहे. आसाममध्ये चहा होतो व तेल मिळते. या दोन गोष्टी बहुतेक सर्वांना ठाऊक असल्या तरी विशेष माहिती नसते.

पूर्वी हा भाग आसाम प्रांतातच होता. त्याशिवाय मणीपूर व त्रिपुरा ही दोन संस्थाने व पूर्वोत्तर सीमा प्रदेश हा केंद्रशासित भाग. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजी राज्यात पर्वतीय प्रदेशातील लोकांना त्यांनी डोंगरातच गुण्यागोविंदाने रहावे व खाली मैदानात येऊन लूटमार करू नये इतपत प्रशासन होते. मिशनरी लोक मात्र डोंगराळ भागात गेले व त्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रचार केला. परिणामस्वरूप आज बऱ्याचशा आदिवासी लोकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला आहे. स्वातंत्र्यानंतर डोंगराळ राज्यांची मागणी झाली व आसाम प्रांताचे तुकडे झाले. संस्थाने गेली व मणीपूर व त्रिपुरा हे प्रदेश प्रथम केंद्रशासित व आता स्वतंत्र राज्ये झाली. नागा लोकांचा प्रदेश नागालॅण्ड (नागभूमी म्हटले तरी चालेल. पण इंग्रजी ही भाषा स्थानिक भाषा म्हणून स्वीकारली आहे व नागालॅंड असेच नाव या राज्याला आहे.) म्हणून १९६३ मध्ये स्वतंत्र राज्य झाले. हे राज्य संपूर्ण डोंगराळ आहे व त्यात जवळजवळ ४० निरनिराळ्या आदिवासी लोकांच्या टोळ्या आहेत. त्यांची एकमेकांची भाषा निराळी आहे व व्यवहार नागामीज म्हणजे ( Nagamese ) नागा व आसामी भाषेच्या मिश्रणात चालतो. राज्यस्तरावर मात्र भाषा इंग्रजी आहे. झो लोकांचा प्रदेश म्हणून मिझोराम हा भाग स्वतंत्र केंद्रशासित राज्य झाला आहे. या नावातील राम म्हणजे झो भाषेतील देश. याचा व अयोध्येच्या रामाचा संबंध नाही व बहुतेक सर्व लोक ख्रिस्ती धर्म स्वीकारलेले आहेत. बांगला देशच्या उत्तरेला खासी, जैन्तिया व गारो लोक रहात असलेला पर्वतीय भाग आहे. या भागाचे मेघालय असे स्वतंत्र राज्य आहे. मेघालय मात्र संपूर्ण संस्कृत नाव आहे. या राज्याची राजधानी शिलाँग. पूर्वोत्तर सीमाप्रदेश हा भाग अरुणाचल प्रदेश म्हणून ओळखला जातो व तो आता केंद्रशासित आहे. म्हणजे आता या भागात पूर्वीच्या आसाम प्रांताच्या जागी सात राजकीय भाग आहेत. आसाम, मेघालय, नागालॅण्ड, मणीपूर, त्रिपुरा ही पाच राज्ये व मिझोराम आणि अरुणाचल प्रदेश हे दोन केंद्रशासित भाग. फक्त आसाम राज्यात मैदानी भाग आहे व थोडासा त्रिपुरा राज्यात. बाकी भाग डोंगराळ.

आठशे किलोमीटर लांब व दोनशे ते तीनशे किलोमीटर रुंद असलेला हा भूभाग उत्तर बंगालमधील दार्जिलिंगजवळ जेमतेम ५० किलोमीटर रुंद पट्टीतून देशाच्या इतर भागाला जोडलेला आहे. यातूनच या भागात येणारे रेल्वे व रस्ते मार्ग येतात. एका बाजूला नेपाळ व दुसऱ्या बाजूला बंगला देश. याशिवाय दुसरा देशाला जोडणारा मार्ग नाही व सीमा परदेशांना लागलेल्या उत्तरेला तिबेट, चीन; पूर्वेला ब्रह्मदेश व दक्षिणेला बांगला देश. त्यामुळे या भागाचे विवक्षित प्रश्न आहेत. त्यातला मुख्य येथल्या लोकांमधील दुर्लक्षित असल्याची भावना दूर करणे व देशाच्या मुख्य जीवनप्रवाहात त्यांना सामावून घेणे हा आहे.

आसाम राज्य हे ब्रह्मपुत्रा नदीचे खोरे एवढेच आता राहिले आहे. जिथे डोंगर सुरू झाले तेथे डोंगराळ भागाचे स्वतंत्र राज्य आहे. उत्तरेला हिमालय, पूर्वेला पटकाई व आराकान डोंगरांच्या रांगा, दक्षिणेला नागा व शिलाँगजवळील मेघालय डोंगराच्या रांगा यांनी हे खोरे वेढलेले आहे. खोऱ्याची रुंदी सरासरी ऐंशी किलोमीटर असून यात ब्रह्मपुत्रा नदी फिरत असते. त्यामुळे पुराचा धोका कायम. नदीचे पात्र अजून पुरेसे खोल व स्थिर झालेले नाही. गाळ खूप वाहून येतो व त्यामुळे पुराचा धोका व पात्र बदलण्याचा संभव खूप. त्यातच

धरणीमाता मधून मधून रागावते व धरणीकंपाने नद्यांच्या प्रवाहात अडथळे व फरक होतात. आसाममध्ये शिलांग डोंगराच्या दक्षिणेकडे कछार हा बराक नदीच्या खोऱ्याचा मैदानी प्रदेश आहे. त्रिपुरा राज्यात थोडासा मैदानी भाग व बाकी तीनचतुर्थांश डोंगराळ भाग. मणीपूर राज्याची राजधानी इंफाळ. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेने दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रह्मदेशाकडून येऊन इंफाळपर्यंत पोचण्याचे असफल प्रयत्न केले होते. इंफाळपासून पन्नास किलोमीटर अंतरावर मोईरांग या गावात ते आले होते. इंफाळजवळ जेमतेम ५० किलोमीटर लांब व ३० किलोमीटर रुंद एवढा मैदानी भाग आहे. हे मैदान चारी बाजूने डोंगरांनी वेढलेले आहे. बाकी नागालॅण्ड, मिझोराम व मेघालय हे डोंगराळ भाग व अरुणाचल प्रदेश संपूर्ण डोंगरच.

### शेती आणि हातमाग

या प्रदेशाची लोकसंख्या १९७१ च्या जनगणनेनुसार जवळजवळ २ कोटी. म्हणजे महाराष्ट्रापेक्षा पुष्कळ कमी. त्यातले १॥ कोटी लोक आसाममध्ये व बाकी सर्व राज्ये मिळून ५० लाख. त्रिपुरा राज्यात पंधरा लाख, मणीपूर व मेघालय राज्यात प्रत्येकी दहा लाख, नागालँड व अरुणाचल प्रदेशात प्रत्येकी पाच लाख व मिझोराममध्ये जेमतेम तीन ते चार लाख. आसाम व त्रिपुरामधील मैदानी प्रदेशात लोकसंख्या वर्ग किलोमीटरला १८० इतकी जास्त आहे. संपूर्ण प्रदेशात गोहाटी, शिलांग, इंफाळ व आगरतळा हीच काय ती लाखापर्यंत वस्ती असलेली शहरे. बाकी मोठ्या गावात जोरहाट, तिनसुखिया, दिब्रुगढ, तेल्लपूर, ठुबरी या आसाममधील ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यातील गावांची गणना केली की संपले. बाकी सर्व भाग खेडवळ व शेती हाच मुख्य उद्योग.

शेती हा मुख्य उद्योग असला तरी शेतीच्या पद्धती परंपरेनुसार चालू असलेल्या आहेत. नवीन तऱ्हेच्या शेतीचे प्रयोग झालेले नाहीत. खतांचा वापर कमी आहे. मोठी जमीनदारी फार नसली तरी जमिनीची मालकी शेतीसुधार कार्यक्रमांच्या आड येते. वीज खेडोपाडी खेळलेली नाही त्यामुळे तिचा शेतीच्या कामात फार उपयोग होत नाही. शेतीसुधार कार्यक्रमाला खूप वाव आहे. पण सध्या या प्रदेशात जवळजवळ पावणेपाच लाख टन धान्य बाहेरून येते. दहा वर्षात योग्य प्रयत्न केले तर हा भाग धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊन धान्य बाहेर पाठवू शकेल.

मोठे उद्योगधंदे अगदी हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच. दिब्रुगढजवळ तेलउद्योग, नामरूपचा खतकारखाना, बोकाजान व चेरापुंजी येथील सिमेंट कारखाने, दोन कागद गिरण्या, गोहाटीची रिफाइनरी एवढी नावे घेतली की झालेच. जंगल उत्पादने होऊ शकतात व प्लायवुड तयार करण्याचे व लाकूड कापण्याचे उद्योग आहेत. जंगले खूप आहेत म्हणण्यापेक्षा होती असे म्हणावयास हवे. जंगलाची मालकी फार थोडी. सरकारी, बाकी गावांच्या वा खाजगी मालकीची. जंगले तोडून पैसे येतात. पण परत जंगलांची जोपासना करावयाची कायम योजना नाही. त्यातच येथल्या डोंगराळ भागात आदिवासी शेतीची पद्धत जंगलांच्या मुळावर येते. डोंगराळ भाग गावांच्या मालकीचा असतो. गाव म्हणजे मोठे कुटुंबच. त्यातील मुख्य डोंगराचा एक भाग निवडतो. मग सर्वजण मिळून सर्व जंगल तोडतात व डोंगर पेटवून देतात. अशी भाजावळ झाली, की कुदळीने खणून त्यात भात, भाज्या, कडधान्ये अशी वर्षाला लागणारी सर्व पिके पेरतात. जमीन सारखी करावयाची किंवा तीच जमीन दरवर्षी कायम वापरावयाची नाही. एका डोंगरात तीन ते चार वर्षे पीक घेऊन झाले की दुसरा डोंगर. ज्यावेळी वस्ती कमी केली त्यावेळी ह्याच डोंगराची पाळी परत १५-२०वर्षांनी येत असे. आता वस्ती वाढली म्हणजे अगदी सात-आठ वर्षांनी परत तोच डोंगर घ्यावा लागतो. यामुळे जमिनीचा कस कमी झाला म्हणून शेती उत्पन्न कमी, जमिनीची धूप वाढली व त्यामुळे गाळ जास्त वाहून मैदानी भागात नद्यांचे पात्रबदल व पूर वाढले आणि जंगले जाऊन डोंगर उघडेबोडके पडले. हा प्रकार कसा थांबवायचा व जंगले टिकवून जमिनीची धूप कशी थांबवावयाची हा मोठा प्रश्न आहे. खूप प्रयोग चालू आहेत. रबर, कॉफी, चहा वगैरे उत्पन्न घ्यावयाचे, डोंगर उतरणीवर खाचरे करून त्यांत कायम शेती करावयाची व त्याकरिता सुधारलेल्या पद्धती व खते वापरायची वगैरे. अजूनपर्यंत तरी या कार्यक्रमांना फार यश आलेले नाही. अशा फिरत्या शेतीखाली या भागात जवळजवळ साडेचार लाख हेक्टर जमीन दरवर्षी असते हे लक्षात घेतले की या प्रश्नाचे महत्त्व व स्वरूप लक्षात येईल.

हातमागावर विणाई हा मोठा उद्योग. मात्र स्वतःच्या गरजेपुरतेच विणायचे. व्यापारी स्तरावर हा उद्योग अजून गेला नाही. महात्मा गांधींनी गोहाटीला व आसामला १९२६ मध्ये भेट दिली होती. त्यांनी त्यावेळी आसामचे व हातमाग उद्योगांचे वर्णन केले आहे. ते म्हणतात "असम अनुपम हरियाली का प्रदेश है, जहाँ नदियों के कुछ दृश्य तो ऐसे है कि जो सारे संसारमें दुर्लभ है। और यही वह प्रदेश है जहाँ स्त्रियाँ सुंदर कपडे बुनती न और अपनेरी बुने हुये कपडे पहनती है।" हे त्यांचे उद्गार गोहाटी स्टेशनवर कोरून ठेवलेले आहेत. येथल्या हातमागावरची विणाईची सफाई व सुंदर सुंदर डिझाइन्स मात्र खरोखरच मोहवून टाकणारी आहेत. पण महात्माजींनी १९२६ साली पाहिला त्यापेक्षा हा उद्योग पुढे गेला आहे असे मात्र नाही. व्यापारी स्तरावर या उद्योगाची घडी बसवून लोकांना घरबसल्या उत्पन्न मिळेल अशा प्रकारे प्रयत्न व्हावयाला हवेत. जे प्रयत्न होत आहेत ते तोकडे आहेत असे म्हणावयाला हरकत नाही.

जंगलांच्या जोडीला या भागात खनिजांचे उत्पादनही खूप आहे. तसा अजून सर्व भाग पाहून व परीक्षून झाला नाही. कोळसा व सिमेंट तयार करावयाला लागणारा चुनखडीचा दगड खूप आहे. डोंगराळ भागात नद्यांच्या पाण्याचा वीज उत्पादनाला उपयोग करून घेता येण्यासारख्या खूप जागा आहेत. प्रत्यक्ष वीज उत्पादन मात्र कमी आहे. संपूर्ण देशात वीजखप. दरडोई १२० युनिट एवढा आहे तर या भागात दरडोई फक्त २५ युनिट. यावरून या भागाचा मागासलेपणा लक्षात येईल.

रेशीम उत्पादनाचा जोड धंदा या भागात आहे. मुगा रेशीम हे या भागातील वैशिष्ट्य आहे जगात आणखी कुठेही याचे उत्पादन होत नाही. याशिवाय इतर प्रकारचे रेशीम किडेही उत्पादन देतात. या जोड धंद्याला आधुनिक स्वरूप देऊन व्यापारी तत्त्वावर उत्पादन वाढवण्याच्या पुष्कळ योजना आहेत.

## यात्रास्थानांचा अभाव

सैन्याच्या नोकरीमुळे वा इतर आवश्यक कामांमुळे या भागात बाहेरून लोक येतात पण मुद्दाम यावे अशा प्रकारची यात्रास्थाने या भागात नाहीत. गंगा नदीच्या खोऱ्यात वा दक्षिण भारतात यात्रेच्या निमित्ताने लोक जातात व त्या निमित्ताने देशाचा भाग पाहून होतो. ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यात त्याप्रमाणे यात्रास्थानांचा प्रसार कमी. गोहाटीला कामाख्या देवीचे पीठ आहे. या बाबतीत अशी कथा आहे की गौरीने दक्षराजाच्या यज्ञात अपमानित झाल्याने प्राणत्याग केला. तेव्हा तिचा मृतदेह घेऊन भगवान शंकरांनी शोक आरंभला व ते वेड्यासारखे झाले. हातांत मृतदेह असल्याने त्यांचा शोक नाहीसा वा कमीच होईना. तेव्हा मृतदेह त्यांच्या जवळून गेल्याखेरीज त्यांचा शोक कमी होणार नाही म्हणून श्रीविष्णूंनी सुदर्शन चक्राने मृतदेहाचे तुकडे करून त्रिखंडात उधळले. त्यावेळी मुख्य योनीचा भाग गोहाटीजवळ पडला व त्याच ठिकाणी कामाख्या हे देवीपीठ आहे. येथे बळी वगैरे होत असतात. मंदिराची वास्तू वगैरे भव्य नाही. यात्रेकरूंची गर्दी होत असते. दुसरी जागा ब्रह्मकुंड म्हणून अरुणाचल प्रदेशात लोहित नदीच्या काठी आहे. भगवान परशुरामांनी वडिलांच्या आज्ञेवरून रेणुका मातेचा वध केला त्या पापाचे क्षालन त्यांनी त्या कुंडांत स्नान करून केले व त्यावेळी त्यांच्या हाताला चिकटून बसलेली कुऱ्हाड किंवा परशु सुटला अशी कथा आहे. उषा अनिरुद्ध यांची प्रणयकथा प्रसिद्ध आहे. उषा या राजकन्येच्या स्वप्नात राजपुत्र अनिरुद्ध आला व तिचे त्यावर प्रेम बसले. अनिरुद्ध हा भगवान श्रीकृष्णांचा नातू. ही उषा ब्रह्मपुत्रेच्या काठी तेझपूर म्हणून गाव आहे तेथली. तेथे आजही उषेला कैदेत ठेवली ती जागा दाखवतात. गोहाटी हे जे या भागातले मुख्य शहर त्यांचे पूर्वीचे नाव प्राग्ज्योतिषपूर. नरकासुराची ही राजधानी. त्याचा मुलगा मोठा ज्योतिषी होता. त्यावेळचे नवग्रह मंदिर अजून येथे आहे. अशा काही कथा निगडित असल्या तरी यात्रेकरूंच्या दृष्टीने इकडच्या भागात येण्याची प्रथा नाही. त्यामुळे व एका बाजूला असल्याने इकडच्या भागाची फारशी माहिती आपल्याला नसते. दुसरी अडचण म्हणजे परदेशांच्या सीमा लागलेल्या असल्याने नागालँड, अरुणाचल प्रदेश, वा मिझोराम या भागात जायला परवानगी घ्यावी लागते. यामुळेही देशांतर्गत प्रवाशांची संख्या या भागात कमी आहे. परदेशी प्रवाशावर अधिकच कडक निर्बंध आहेत.

मूळच्या आसाम प्रांतातून नागालँड, मिझोराम, मेघालय ही राज्ये डोंगराळ भागाची म्हणून निराळी करण्यात आली. सीमा ठरवताना त्यावेळचे जिल्हे वगैरे होते तशाच ठरवण्यात आल्या. परिणामस्वरूप या राज्यात मैदानी भाग मुळीच राहिला नाही. सीमा प्रश्नावर मेघालय–आसाम, आसाम-नागालँड, आसाम-मिझोराम असे खूप वादविवाद आहेत. आता आसाम व अरुणाचल प्रदेशात पण असे वाद सुरू झाले आहेत. हे विवाद वाढत आहेत व येथले राजकारणी व केंद्र सरकार यातून मार्ग काढण्याचे प्रयत्न करीत आहेत. दुसरा प्रश्न स्थानिक व अस्थानिक लोकांचा आहे. आसाम सोडल्यास बाकी भागात जवळजवळ पंचाहत्तर टक्के लोक आदिवासी आहेत. जसजशी त्यांना आपल्या हक्कांची जाणीव होते आहे तसतसे सीमाप्रश्नावरून, स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळण्यावरून वगैरे वाद वाढत आहे. या प्रश्नावरून कधीकधी शांतताभंग पण होतो. या वादांचा राजकारणाकरिता उपयोग करून न घेता सामान्य लोकांचे हित लक्षात घेऊन मार्ग व तोडगा निघायला हवा.

## प्रत्येक गावात चर्च

डोंगराळ भागातील आदिवासी लोकांचा आपला असा रुढाचार वा धर्म आहे. हा धर्म अगदी प्राथमिक अवस्थेत आहे. भूत-प्रेत पूजा, वृक्षपूजा वगैरे. सरकारी पाठबळावर ख्रिश्चन मिशनरी इंग्रजी राज्यात या भागात शिरले व बऱ्याचशा आदिवासी लोकांना त्यांनी ख्रिस्तानुयायी बनवले. या भागात प्रत्येक गावात चर्च दिसते. मिझोराममध्ये जवळजवळ ९० टक्के लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे. नागालँडमध्ये फार थोड्या जमातींनी आपला पहिला धर्म टिकवून धरला आहे. मेघालयामधील मुख्य तीन जमातींपैकी खासी लोक ख्रिस्ती आहेत. बाकी गारो जैन्तिया यांनी आपला पहिला धर्म ठेवला आहे. मणीपूर हे हिंदु संस्थान होते त्यामुळे त्या राज्यात मिशनरी लोकांना फारसा वाव मिळाला नाही. त्रिपुरामध्ये पण हिंदु धर्मच प्रमुख आहे. जरी ख्रिस्ती धर्म मिशनरी लोकांच्या प्रसारामुळे स्वीकारला गेला तरी आदिवासी लोकांनी आपले पहिले आचार व धर्म पाळणे चालूच ठेवले आहे.

प्रलोभनांच्या जोरावर धर्म बदलता येऊ नये म्हणून अरुणाचल प्रदेशाच्या विधान सभेने सक्तीच्या व प्रलोभनाच्या जोरावर होणाऱ्या धर्मांतराला विरोध करणारे विधेयक मंजूर केले. मुख्यत: मिशनरी लोकांच्या धर्मप्रसाराला यामुळे आळा बसणारा असल्याने त्यांनी या कायद्याला खूप विरोध केला. नागालँड, मिझोराम व मेघालय या राज्यात अरुणाचल प्रदेशने केलेल्या कायद्याला खूप विरोध प्रदर्शित करण्यात आला. अरुणाचल प्रदेशाने संमत केलेल्या विधेयकाला राष्ट्रपतींनी मान्यता दिली आहे. तरी पण या प्रश्नावरही येथे खूप अस्वस्थता आहे.

या ईशान्य भागात एकूण देशाचे ७·७% क्षेत्रफळ आहे व ३·६% लोकसंख्या या भागात आहे. सीमा परदेशांना लागलेल्या असल्याने मोक्याच्या दृष्टीने हा भाग महत्त्वाचा आहे. देशाच्या इतर भागाला अगदी नाजुकपणे जोडलेला असल्याने या भागाचे प्रश्न गुंतागुंतीचे आहेत. अनेक वंशांचे व आदिवासी लोक या भागात रहातात. जवळजवळ ७०% भाग डोंगराळ आहे. पूर व धरणीकंप वारंवार येतात. खूप नैसर्गिक संपत्ती असून तिचा उपयोग अजून करून घ्यावयाचा आहे. हा भाग मुद्दाम पहावयाला येण्याचे केल्यास विविध प्रकारचे नैसर्गिक सौंदर्य मात्र डोळ्यांना सुखावेल. आपल्या भारताचे विशाल स्वरूप पहावयाला मिळून अचंबा वाटेल.

# बालसाहित्य अगणित प्रश्नचिन्हे

दत्तात्रय दिनकर पुंडे

आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून साजरे होत आलेले ७९ साल संपत आले. याचा एक दृश्य परिणाम म्हणजे बालसाहित्याची प्रमाणाबाहेर निर्मिती झाली. अजूनही चालूच आहे. वृत्तपत्रातून झळकणाऱ्या जाहिराती पाहिल्या, की ही बालसाहित्याची सूज यंदा किती वाढली हे कोणाच्याही चटकन लक्षात येईल. सन्मान्य अपवाद वगळता बालसाहित्य हे लेखक-प्रकाशकांचे एक चरायचे कुरणच झाले की काय अशी शंकाही येऊन जाते.

शाळांना सुट्या लागल्या की बालसाहित्याचे ढिगारे गोडाऊनबाहेर निघतात. बालसाहित्याची प्रदर्शने, जत्रा भरू लागतात. बालसाहित्याची दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रमही काही दिवसांपूर्वी झाल्याचे स्मरणात आहे. पुस्तक विक्रेते बालसाहित्य विकत असतात आणि पालक ते आपल्या मुलांची 'वाचनाची हौस' पुरविण्यासाठी खरेदी करीत असतात. पण बालसाहित्याची ही निर्मिती आणि बालवाचकांच्या अभिरुचीची जोपासना यामागे कोठेही काही नियोजन वा दृष्टी असल्याचे दिसत नाही. परिणामी 'वेताळ पंचविशी' सारखी कामजीवनावरील अश्लील कथा समाविष्ट असणारी पुस्तके किंवा 'सुंदरीच्या हिऱ्याचे रहस्य' सारखं नाव धारण करून येणारी रहस्यकथांची पुस्तके विकली-खरीदली जातात. आणि अर्थातच बालवाचकांकडून ती वाचलीही जातात. या साऱ्या गोंधळाच्या वातावरणाकडे आपण सर्वांनी गंभीरपणे पाहण्याची वेळ आली आहे असे वाटते.

बालसाहित्याचे स्वरूप आणि अपेक्षा लक्षात न घेता लेखक आणि प्रकाशक हे दोघेही बालसाहित्यात भर घालीत आहेत. प्रकाशक (पुन्हा अत्यल्प सन्मान्य अपवाद वगळता) बालसाहित्याकडे व्यवसाय म्हणून नव्हे तर सरळ धंदा म्हणून पाहात आहेत, असे चित्र दिसते. प्रथितयश लेखकांची बालसाहित्य निर्माण करण्याची वृत्ती आणि कुवत आहे की नाही हे न पाहताच प्रकाशक त्यांच्यामागे 'काहीतरी लिहून द्या' चा लकडा लावतात. लेखकही प्रकाशकाच्या आग्रहाला किंवा स्वतःच्या प्रसिद्धीच्या मोहाला बळी पडून (अप्रामाणिकपणे) लिहून देतात. सारे 'नावावर' धकून जाते. कधी ते नाव प्रकाशकाचे असते तर कधी ते लेखकाचे. मराठीचे मान्यवर म्हणून गणले जाणारे, ज्यांच्या काव्य, कथा, कादंबरी, नाटक आदि साहित्य-कृतीविषयी रसिकमनात अतीव आदर व प्रेम आहे, असे किती लेखक बालसाहित्य लिहितात? त्यातील किती लेखक ते जाणीवपूर्वक लिहितात? ज्या अशा थोर लेखकांनी बालसाहित्य लिहिले आहे ते खरोखरीच बालवाचकांना प्रिय होणार आहे का? रांजणाच्या तळाशी असलेले पाणी पिण्याकरिता रांजणात खडे टाकणाऱ्या कावळ्याची पारंपरिक गोष्टच लिहून किंवा इंग्रजीतील सालोमनची आठवड्याच्या सात वारांची ओळख करून देणारी कविताच मराठी पेहेरावात सादर करून (एरव्ही आपल्या प्रौढांकरिता लिहिलेल्या साहित्याच्या संदर्भात पुन्हा प्रथितयश) प्रतिष्ठित लेखक म्हणून वावरणारे साहित्यिक आपणास का दिसतात? लोककथा किंवा 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' सारख्या उत्तमोत्तम कृतींचे अनुवाद बालवाचकांसमोर यायला हवेत हे खरे. तथापि बहुतांशवेळा ह्या लोककथा आणि ह्या परदेशी बालसाहित्यकृती बालवाचकांना सादर केल्या जातात त्या विकृत आणि हिणकस रूपातच. त्यातही पुन्हा एकच कृती अनेकांनी अनेक रीतीने हिणकस रूपात सादर करण्याची जणू चढाओढ लागलेली असते. त्यामुळे लेखक—विशेषतः प्रथितयश लेखक प्रसिद्धीच्या मोहामागे धावतच राहणार का? ते गल्लाभरू प्रकाशकाच्या इशाऱ्यावर आपली लेखणी बालसाहित्याच्या निर्मितीकरिता हवी तशी 'राबविणार' का?

बालसाहित्य प्रकाशित करण्याबाबत प्रकाशकांचा नेमका दृष्टिकोन कोणता हा एक वादग्रस्त प्रश्न ठरू शकतो. बालसाहित्याच्या प्रकाशनामागे प्रकाशकाची निश्चित स्वरूपाची ध्येय-धोरणे आहेत का? बालपुस्तकातील मजकूर आणि चित्रे यांची काही सुसंगती राखण्याबाबत प्रकाशक दक्ष आहेत का? आपले प्रकाशन बालवाचकांना आवडावे, त्यांच्या पसंतीला उतरावे याबाबत प्रयत्नशील आहेत का? बालवाचकांना नेमके कोणत्या प्रकारचे साहित्य रुचते याची पाहणी करण्याचा आणि त्यानुसार आपल्या बालसाहित्य प्रकाशनाचे नियोजन करण्याचा प्रकाशकांनी कधी प्रयत्न केला आहे का? एवढेच कशाला, आपले प्रकाशित वाङ्मय वाचकांपर्यंत पोचविण्याची तरी त्यांना तळमळ आहे का? जिल्हा परिषदांनी, शिक्षणखात्याने खरीदलेली आपली बालप्रकाशने बालवाचकांपर्यंत पोहोचतात की नाही हे जाणण्याची उत्सुकता त्यांना असते का? बालसाहित्याच्या प्रकाशकांनी हे सारे प्रश्न स्वतःला विचारून पहायला हवेत.

ज्या प्रकाशकांकडे प्रकाशन-व्यवसायाची काही दृष्टी आहे ते प्रकाशक बालसाहित्याच्या प्रकाशनाच्या 'भानगडी'त पडत नाहीत. दर्जेदार (प्रौढ) साहित्य पुरविण्यास कनिष्ठ असलेल्या प्रकाशन संस्थांनी गेल्या पाचेक वर्षात किती बालपुस्तके प्रकाशित केली आहेत? केली असल्यास प्रकाशित प्रौढ साहित्याशी त्यांचे शेकडा प्रमाण किती? तात्पर्य, ज्यांच्याकडे प्रकाशनाची दृष्टी आहे त्यांना बालसाहित्याबाबत कमालीची उदासीनता, अनास्था आहे आणि ज्यांच्याकडे...असो.

लेखक बालसाहित्याच्या दुर्दशेच्या स्थितीपासून अलिप्त नाहीत हे वर आलेच आहे. 'सहज सुचले म्हणून' अशीच त्यांची बालसाहित्य निर्मिती असते. बालसाहित्य लिहिणे त्यांना अप्रतिष्ठेचे वाटते काय? अनेकदा बालसाहित्य संमेलने भरली. या संमेलनात भाग घेणारे, निदान हजर असणारे कोण होते व किती होते हे पाहणे मोठे मनोरंजक ठरेल. बालसाहित्य संमेलनाशी (मोठ्या) साहित्यसंमेलनाप्रमाणे रुसण्याफुगण्यापासून, मानापमानापासून बहिष्कारांपासून अलिप्त राहू शकत

नाही. हे खेदजनकच म्हणावे लागेल.

लेखक–प्रकाशकांप्रमाणेच समीक्षकही बालसाहित्याकडे किती अनास्थेने पाहात आहेत याचा एक पुरावा खुद्द शासनाकडे उपलब्ध आहे. १९६० मध्ये शासनाने 'मराठीतील बालवाङ्मयाची सूची' प्रकाशित केली आहे. या सूचीमध्ये अर्नाळकर आणि इतर रहस्यकथा–लेखकांच्या रहस्य-कथांची लांबलचक यादी समाविष्ट आहे. याच सूचीत गफलतीने काही प्रौढ साहित्यही समाविष्ट केले गेले आहे हे पुन्हा वेगळे सांगायला नकोच.

पालकवर्गही बालसाहित्याबाबत जागरूक दिसत नाही. एक तर पालक आपल्या मुलांकरिता बालसाहित्य वगैरे खरेदी करण्यास फारसे अनुकूल दिसत नाहीत. जे बालसाहित्य खरीदतात ते आपल्या मुला–मुलींना वाचावयास 'काहीतरी' आणून देण्यापुरता आपला दृष्टिकोन ठेवतात. शाळांमधील बालसाहित्य पुरवठ्याचे कामकाज अव्यवस्थित असते. बहुतांश शाळातील बालग्रंथालये कोठल्यातरी अडगळीत गंजलेल्या कुलुपानिशी 'सुरक्षित' असतात. जाता जाता आणखी एक प्रश्न विचारायलाच हवा. तो म्हणजे केवळ बालांसाठी अशी ग्रंथालये चालविली जातात का ?

लेखक, प्रकाशक, पालक, शाळाचालक यांच्या या अनास्थेतून चुकूनमाकून एखादे पुस्तक बालवाचकाच्या हाती आले तर ते बालसाहित्य असण्याऐवजी अगोदर म्हटल्या-प्रमाणे 'वेताळ पंचविशी' सारखी कामकथा किंवा सुंदरीच्या प्रेताची रहस्यकथाच असण्याचा संभव अधिक नाही काय ? बालापर्यंत काही बरे साहित्य पोचविण्याचा खटाटोप 'किशोर' (या उपक्रमाबद्दल शासनास मनापासून धन्यवाद) 'कुमार' 'फुलबाग' इत्यादी बालमासिके आणि अगदी थोडी लेखक–प्रकाशक मंडळी करीत आहेत. पण एका बाजूने पालकांची, शिक्षण-संस्था चालकांची अनास्था आणि दुसऱ्या बाजूने लेखकांचे 'चोरटे' सहकार्य यामुळे त्यांच्याही प्रयत्नाला मर्यादा पडत आहेत.

तात्पर्य, बालसाहित्याच्या बाबतीत आपण सारेच उथळ दृष्टिकोन ठेवून आहोत. त्याची गंभीरपणे दखल घेतली जावी म्हणून ही टोकाची प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. *

# एका विकृत धर्मपंथाचे दर्शन

भौतिक सुखाची लयलूट असलेला अमेरिके-तील संपन्न समाज, श्रद्धेचे विभजन टाळणारा तिथला एकेश्वरवादी धर्म; तेथील पुरोहित वर्ग म्हणजे काय समृद्धीची साय-साखर ! आपल्यासारखे थोडेच ३३ कोटी देव, दुर्गंधीयुक्त देवालये, अठराविश्वे दारि-द्र्याने पिडलेला 'भटजी' वर्ग ? यापैकी तिथे कशाचाच मागमूस नाही. मग श्रद्धा डळमळीत होतील कशा ? डूमसडेची वाट न पाहता, त्या जिझसपेक्षा मुक्तीचे 'इमिजिएट पेमेंट' करणारा मर्त्य मानव असू शकेल यावर तिथल्या लोकांचा विश्वास बसेल कसा ? हे सारे घडावे ते आपल्यासारख्या या अंधश्रद्धाळूंच्या देशात.

पण नाही ! हे घडले आहे ते त्या अत्या-धुनिक अमेरिकेत. देश एवढा अत्याधुनिक म्हटल्यावर तिथला एखादा बुवा हाही आपल्या बुवांचा गुरूच असायला हवा. कोणी एक जोन्स उठतो, स्वतंत्र चर्च स्थापन करतो, स्वतःला प्रतिदेव किंवा भगवान मानून मर्त्य मानवांना अमरत्वाचे आश्वासन देतो, गलिच्छ, भयानक शिक्षा आपल्या शिष्यांना देतो, शेवटी जगातील महाभयंकर व अभूतपूर्व असा सामूहिक आत्महत्येचा मार्ग पत्करतो. सारेच विस्मयजनक. वॉटरगेटसारखे प्रकरण रात्रीच्या अंधारातून उपसणारे व राष्ट्र-प्रमुखाला पदच्युत करणारे अमेरिकन पत्रकार या ईश्वरी साक्षात्कारापुढे 'ब्र'ही उच्चारत नाहीत. सामान्यांचे सोडाच; पण या बुवाचे चक्क व्हाईट हाऊसमध्येही प्रस्थ वाढते.

सारेच नाट्यमय. कोणाही प्रतिभाशाली लेखकाला मोह पडावा असे आव्हानात्मक कथानक. आव्हानात्मक एवढ्यासाठी जोन्सच्या बुवाबाजीला वाचा फुटली ती त्याच्या मरणोत्तर. तत्पूर्वीची अगदी जोन्स जन्मण्यापूर्वीपासूनची माहिती संकलित करून सुसंगत मांडणे हे आव्हानच होते. विजय कुवळेकर या तरुण पत्रकाराने 'एका मृत्यु-पंथाची अखेर' या पुस्तकात हा सर्व नाट्य-मय इतिहास व्यवस्थित सादर केला. इतका व्यवस्थित, की जोन्स कोण हे अजिबात माहिती नसलेल्यालाही अंगावर शहारे यावेत.

कुवळेकर यांची भाषाशैली उत्तम आहे. विषयाचा विस्तारही समंजसपणे केला आहे. वस्स लेखकाने एवढे कौशल्य दाखवल्यावर मुळात रोचक असलेल्या या कथानकाचेवर वाचनीय असे पुस्तक व्हायला काय वेळ लागणार ?

या पुस्तकात जोन्स जन्मण्यापूर्वीचे त्याच्या घरचे वातावरण, त्याच्या आई-बापाचा स्वभाव, जोन्सचा जन्म, बालपणीच आढळ-लेली नेतृत्वाची लक्षणे अशा व्यवस्थित टप्प्याने जोन्सचे व्यक्तिमत्त्व साकारत जाते.

हाच जोन्स पुढे टेंपल चर्चची स्थापना करून स्वतः प्रेषित बनतो. तेव्हा खऱ्या अर्थाने त्याच्या व्यक्तिमत्त्वास बहर येतो. दुसऱ्यावर छापा पाडून शिल्प जमवणारा व त्यांना आर्थिक विकलांग करून आपल्या संघटनेशी कायमचा जखडून टाकणारा जोन्स वाचताना लेखक मोठ्या खुपीने हा खरा आध्यात्मिक नेता नाही हे सांगतो. लेखक फक्त काय घेतले कसे घडले हेच सांगतो. त्यासाठी त्याला वेगळे भाष्य करण्याची गरजच भासत नाही. अध्यात्माचा डिमडिम पटणारा जोन्स अंतर्यामी किती क्षुद्र व संकुचित मनोवृत्तीचा होता हे लेखकानेही विशेषणे न वापरताही दाखवून दिले आहे. आपल्यावर खुनी हल्ला होऊ नये म्हणून आपल्यासारख्या दिसणाऱ्या एका शिष्यास आपले रूप देण्याचा प्रयत्न वाचून वाचक उमजून चुकतो, की इतरांना मृत्यूपासून अभय देणारा हा प्रेषित अंतर्यामी स्वतः मृत्यूस भीत होता.

जोन्सचे व्यक्तिचित्र साकारताना लेख-काने पक्षपाती लेखणी चालवलेली नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ही काळी बाजू मांडत असतानाच तो कसा धूर्त राजकारणी होता, एवढे शिष्यांना कळूनही त्याचा प्रभाव कसा वाढत होता, वगैरे गोष्टींचाही साक-ल्याने विचार केला आहे. यामुळे एका विकृत मनोवृत्तीचे समतोल विश्लेषण असे स्वरूप या पुस्तकाला प्राप्त झाले आहे.

केवळ जोन्स व त्याच्या पंथाची माहिती देणे एवढेच काम या पुस्तकाने बजावले असे मी मानत नाही. पाश्चिमात्याकडून उसने घेतलेले शिक्षण फार घेतल्याने नास्तिक

ऊर्फ बुद्धिवादी झालेल्या स्वकियांना यातून फार शिकण्यासारखे आहे. लोकांच्या श्रद्धेचा बाजार मांडणे हे केव्हाही वाईटच. पण ते केवळ आपल्या येथे व केवळ हिंदू धर्मातच आहे असे मानणाऱ्यांनी हे पुस्तक जरूर वाचावे. पुढारलेल्या देशातील अंधश्रद्धाही किती पुढारलेल्या असतात ते त्यांना समजेल.

— अरुण रामतीर्थकर

एका आत्महत्यापंथाची अखेर
विजय कुवळेकर
श्रीविद्या प्रकाशन.
पृष्ठे १५७, मूल्य–रु. १७–५० पैसे.

---

' फिनिक्स ' निवड

## The Scope of Happiness

( A Personal Memoir )
Vijaya Laxmi Pandit
Vikas Publishing House Pvt. Ltd.
Pages 333, Rs. 125/-

---

आपण कधी नं. १ च्या पैशाने रु. १२५/– चे पुस्तक घेतले आहे का ? मी दोनदा घेतले आहे. दोन्ही वेळा माझे डोळे पाणावलेले झाल्याचे मला आठवते. त्या दुकानदाराला माझे पुस्तकाबद्दलचे प्रेम माहीत होते. त्याला वाटले मला एक चांगले पुस्तक लवकर मिळाले म्हणून माझ्या डोळ्यात आनंदाश्रू आले.

या आधीचे मी रु. १२५/- ला घेतलेले पुस्तक म्हणजे मोरारजी देसाईंच्या आत्मचरित्राचे दोन भाग. आमच्या वाचकांनी इतर वाचनालयांच्या आधी पुस्तक वाचावे व त्यांच्या डोळ्यांचे कमी नुकसान व्हावे म्हणून आम्ही हार्डकव्हर एडिशन्स घेत असतो. परंतु कधी कधी पुस्तकांच्या जगात असे होते, की अवघ्या दोन–तीन महिन्यात त्याच पुस्तकाची पेपरबॅक निघते. मग घ्या विजयालक्ष्मीचे पुस्तक रु. २० ला असे दुकानदार म्हणतो. त्या दिवसाची रात्र मग युजीन ओ ' नीलच्या A Long Day's Journey into night सारखी काढावी लागते.

मराठीत सुद्धा अलीकडे रु. १००/- च्या वरती एक पुस्तक घेतले ते ' शेलार खिंड.' बाबा पुरंदरे यांचे. या पुस्तकाची किंमत आहे रु. १०५/- आता थोड्या वर्षांनी रु. १०००/- किंमतीचे पुस्तक निश्चितच बाजारात येईल. त्या वेळेला माझे डोळे पाणावलेले नसता मिटलेले असतील तर पुष्कळ बरे. आणि मग सिगारेटच्या पाकिटाच्या खाली लिहिलेल्या वॉर्निंगप्रमाणे पुस्तकाच्या जाकिटाच्या खालीही अशी स्टेटचुटरी वॉर्निंग लिहावी "Book-buying may be injurious to the family of No. 1 People."

' आमच्या वाचनालयात आणखीन काही १०० रु. च्या आसपासच्या किमतीची पुस्तके म्हणजे Jacob Bronowski चे Ascent of Man, गुंथरची इनसाईड आफ्रिका, युरोप, रशिया, लॅटीन अमेरिका, तसेच मनीचेंजर्स, मिस्टिरियस नॉलेज, गायत्री देवींचे Princess Remembers, डायजेस्टचे व्हॉल्यूम्स, बी. आर. नंदांचे गोखले यांचे चरित्र, इकबाल सिंगचे Andaman story, निराद चौधरींचे Hinduism, Cycles of Heaven, व्ही. बी. कर्णिकांचे M. N. Roy वगैरे. आमच्या एका वाचकाने रु. ९००/- किंमतीचे हिमालयावरील पुस्तक पाहिले आहे.

परवा इंदर मलहोत्राने लिहिलेल्या या पुस्तकाचे परीक्षण ' टाइम्स ऑफ इंडिया ' मध्ये वाचले. त्यात मलहोत्रा म्हणतात की, या पुस्तकातले सर्वात भारावून टाकणारे प्रकरण फक्त दोन पानाचे आहे. या प्रकरणाचा मथळा आहे ' The Parting ' नेहरू गेल्याच्या दिवसाचे टिपण या प्रकरणात केले आहे. बुद्ध जयंतीच्या दिवशी मरण आल्यास किती चांगले होईल, असे एकदा नेहरू म्हणाले होते. आणि तसेच झाले. हे काही लोकांना माहिती नाही. या खेरीज या प्रकरणात नवे किंवा प्रकाश टाकणारे काहीही नाही. चीनच्या विश्वासघातामुळे नेहरूंच्या प्रकृतीवर जबरदस्त परिणाम झाला होता, नेहरूंच्या सल्लागाराने माहिती असून त्यांना योग्य सल्ला दिला नाही वगैरे वगैरे गोष्टी या प्रकरणात आहेत. विजयालक्ष्मींना नेहरूंच्या मृत्यूची बातमी विमानात कळली तेही याच प्रकरणात आहे. काही वर्तमानपत्रात ही बातमी पुस्तक प्रसिद्ध होण्याच्या आधी आली होती. परंतु इतिहासाच्या दृष्टीने या गोष्टीला एवढे महत्त्व नाही.

' ही बाई फारच उच्चभ्रू आहे,' माझ्या ग्रंथालयात टेबलावर विजयालक्ष्मीचे पुस्तक बघून एक दोन वाचक म्हणाले. ' या बाईने ४५००० रु. खर्चून गालावर प्लॅस्टिक सर्जरी किंवा कॉस्मेटिक सर्जरी करून घेतली आहे.' ही गोष्ट सत्य आहे की नाही हे मला माहीत नाही. पण सबंध नेहरू घराणेच उच्चभ्रू आहे. हिशेबच काढला तर नेहरू घराण्याने विमान, मोटार, परदेश दौरे, हेलीकॉप्टर या गोष्टीत कैक कोटी रुपये खर्च केले असतील. त्यात रु. ४५००० म्हणजे चिकन फिडच.

विजयालक्ष्मींच्या या सबंध पुस्तकातून एक रिफाईण्ड, संयमी ॲरिस्टॉक्रसीचा प्रवाह जाणवतो. उच्चभ्रू होऊन माणूस जर एवढा संयमी व elegant होऊ शकतो तर उच्चभ्रू होण्यात कोणतेच पाप नाही. आणखीन एक विजयाबाईंविषयी म्हणावे लागेल. या पुस्तकातल्या काहीकाही गोष्टी आपण आधी वाचल्या आहेत हे आपल्याला जाणवते. परंतु विजयाबाईंची शैली इतकी सहजसुंदर व ओघवती आहे की, याच गोष्टी त्यांच्या


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

पुस्तकात परत वाचताना आपल्याला कंटाळा येत नाही.

पुस्तक प्रसिद्ध होण्याच्या आधी नियतकालिके त्यातील काही भाग उद्धृत करतात आणि त्यामुळे पुस्तकाचे परीक्षण करणे अवघड होते अशी तक्रार श्री. इंदर मलहोत्राने याच पुस्तकाच्या परीक्षणात केली आहे. परंतु हे उतारे एकतर अगदी मसालेदार तरी असतात किंवा ते वाचकाची उत्कंठा जागृत करणारे असतात. पुष्कळसे उच्चभ्रू ही परीक्षणे वाचूनच पुस्तकाविषयी चर्चा करीत असतात. सध्या instant चे दिवस आहेत. आणि म्हणूनच आमच्या ग्रंथालयात काही वाचकांना जर सबंध पुस्तक वाचण्याचे परीश्रम घ्यायचे नसतील तर आमच्याकडील पुस्तकाच्या आत चिकटवलेली कात्रणे वाचून, सबंध पुस्तक वाचल्यासारखे करून ते मिरवू शकतील.

एकदा इंदिराबाईंनी विजयालक्ष्मींना स्पष्ट सांगून टाकले, 'आत्या, खरंच तुझ्यावर माझा विश्वास नाही.' यावर विजयाबाई उठल्या व इंदिरा गांधींच्या मस्तकाचे चुंबन घेऊन म्हणाल्या, 'सत्य सांगितल्याबद्दल तुझे आभार मानावे तेवढे कमीच !' या पुस्तकात इंदिराबाईंविषयी आक्रस्ताळेपणा नसला तरी विधायक टीका भरपूर आहे. आत्या-भाचीचा ब्रेक टोटल व कंप्लीट वाटतो.

स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी अल्ल्या भारतात दोन स्त्रियांची व्यक्तिमत्त्वे पुष्कळच वजनदार होती. एक म्हणजे विजयाबाई व दुसऱ्या सरोजिनी नायडू. दोघींची बुद्धिमत्ता स्त्री मुक्ती चळवळ न्हाऊन निघेल अशी. पण एक दिसायला अगदी रिफाईन्ड व दुसरी अगली डकलिंग. त्यावेळच्या आणखीन महत्त्वाच्या स्त्रिया म्हणजे राजकुमारी अमृत कौर व कमलादेवी चट्टोपाध्याय.

या पुस्तकात बड्या बड्या आंतरराष्ट्रीय व्यक्तींची बरीच नावे आढळतात. या मिनारी व्यक्तिमत्त्वाच्या माणसाबरोबर विजयालक्ष्मी सहजरीत्या मिसळत. पण मला एक गोष्ट खटकली. नेहरू घराण्यात पंडितजींचे जेवढे पुस्तकावर प्रेम होते तेवढे विजयाबाईंचे व इंदिराबाईंचे नाही. या आठवणीवजा आत्मचरित्रात्मक पुस्तकात लेखक व पुस्तके हे विषय जवळजवळ नाहीतच. के. ए. अब्बासच्या आत्मचरित्रात निदान प्रसादापुरती तरी लेखकांची नावे आहेत.

क्वचितच विजयाबाईंनी या पुस्तकात संयम सोडला आहे. पहिल्या तीन चार पानातच इंदिरा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना 'सापासारखा विश्वासघातकी' असे म्हणाल्या होत्या असे लिहिले आहे. निव्वळ खासगी संभाषणात (आणि तेसुद्धा नातेवाईकात) व पूर्ण विश्वासाने व्यक्त केलेली मते पुस्तकात छापणे कितपत योग्य आहे याचा विजयाबाईंनी सारासार विचार करायला हवा होता.

पुष्कळ लोकांना असे वाटते की विजयाबाई व सय्यद हुसेन यांच्या मैत्रीविषयी या पुस्तकात असावा तेवढा खुल्लंखुल्लेपणा नाही. पण मला वाटते हा एक वैयक्तिक प्रश्न आहे. आत्मचरित्राचे तीन प्रकार असतात. पहिल्या प्रकारात आत्मचरित्रात सतत वल्गना आढळते. दुसऱ्या प्रकारात परिस्थितीप्रमाणे जेवढे सांगायचे तेवढेच सांभाळून सांगितले जाते. तिसऱ्या प्रकारात मात्र सत्याचा पाठपुरावा केलेला सातत्याने आढळतो. पहिल्या प्रकारात अब्बास, दुसऱ्या प्रकारात विजयाबाई व तिसऱ्या प्रकारात बर्ट्रांड रसेलची आत्मचरित्रे मोडतील. सर्वात वाचनीय आत्मचरित्रे असतात ती या तिसऱ्या प्रकारातील.

या पुस्तकात ९९ फोटो आहेत (सव्वा २पयाला एक) पुस्तकाच्या शेवटचा इंडेक्स इतका बारीक आहे की मध्यमवयाच्या व म्हाताऱ्या लोकांच्या डोळ्यांना तो पेलणार नाही. पुस्तकाची छपाई व फोटो मात्र छान आहेत.

—जे. एन्. पोंडा


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. नाही नाही त्रिवार नाही— (राजकीय)— पुरुषोत्तम गणेश मावळंकर | | रुपये |
| २. एक विचारवंत— (कार्ल मार्क्स) (परिचय)— सुमती देवस्थळे | | १५/— |
| ३. एस. एम्. जोशी यांचा उदात्त प्रेमविवाह—गजानन शं. खोले | | ७/— |
| ४. कमोदिनी— (कादंबरी) रणजित देसाई | | |
| ५. मोठी माणसे— (भाग १ व २) (व्यक्तिचित्रे) बाळ सामंत | प्रत्येकी | १६/— |
| ६. बारा लाखात जगाची सफर— (प्रवास वर्णन)— रमेश मंत्री | | १५/— |

ENGLISH

| | |
|---|---|
| 1. Wild Justice— ( Shriller ) Wilbur Smith | 32/— |
| 3. The Deer Hunter— ( Picture Story on war )— B M. Croder | |
| 3. The Sixth Commandment— ( Novel·Bestseller )— Lawrence Sanders | 22·10 |
| 4. Devil's Alternative— ( Bestseller-Thriller ) — Fredrick Forsyth | |

' Here in our new flat in my arm chair,
A glass of lemon squash ( thanks to M. Desai ),
A Phoenix book with clippings,
And Thou beside me singings,
Oh ! Hppiness with a Phonix book is complete.
— ( with apologies to Omar Khayam ).

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

रंगभूमी

विनया खडपेकर

# नसती बिलामत

## निखळ विनोदी फार्स

इंडियन नॅशनल थिएटर निर्मित नसती बिलामत या नाटकाचा पहिला प्रयोग साहित्य संघ मंदिर, गिरगाव येथे संध्याकाळी सात वाजता झाला. या नाटकाचे लेखक आहेत श्री. गंगाधर गाडगीळ आणि दिग्दर्शक आहेत श्री. आत्माराम भेंडे.

कथालेखक, समीक्षक, कादंबरीकार, नाटककार, आणि अर्थशास्त्रज्ञ म्हणूनही श्री. गंगाधर गाडगीळ आपल्याला परिचित आहेत. त्यांच्या बंडूच्या नाटिकांनी आणि 'वेड्याच्या चौकोन'ने शाळा कॉलेजात आणि हौशी रंगभूमीवर धमाल उडवून दिली आहे. तरीही मला वाटते, व्यावसायिक रंगभूमीवर आलेले हे त्यांचे पहिले विनोदी नाटक-यापूर्वीचे त्यांचे 'जोत्स्ना आणि ज्योती' अगदी वेगळ्या प्रकृतीचे गंभीर नाटक होते. त्याला प्रायोगिक यश लाभले नव्हते. श्री. गाडगीळ यांचे 'नसती बिलामत' मात्र दणदणीत यशस्वी व्हावे असे तुफान विनोदी नाटक आहे.

'नसती बिलामत' पाहिले आणि कितीतरी महिन्यांनी कोणताही बाष्कळपणा, सांकेतिकता नसलेले खरेखुरे विनोदी नाटक पाहिल्याचे समाधान मिळाले. नाटक पाहताना तीन तास कसे गेले ते समजलेही नाही. एरवी हल्ली नाटके पाहताना अजून कितीवेळ हा वैताग चालायचा असे वाटून एकसारखे घड्याळाकडे लक्ष जाते.

नानासाहेब सहस्रबुद्धे हे एक शास्त्रज्ञ. अनेक विद्वान लोकांप्रमाणे ते विसराळू, धांदरट आहेत. ते जागतिक महत्वाचे शोध लावतात. त्यामुळे त्यांना राष्ट्रीय दृष्टया एकदम महत्व येते. त्यांच्याबरोबर अर्थात त्यांच्या पत्नीलाही महत्त्व येते. मात्र तिला त्याची फारशी जाणीव नसते. दोघांची छायाचित्रे छापून येतात. मुलाखती घेतल्या जातात. शास्त्रज्ञाला कोणी पळवून नेईल अशा भीतीने घरावर पोलिस-पहारा बसतो. अरब देशातले प्रो. बिलामत नानासाहेबांना भेटायला येतात. तेव्हा त्यांचा अरबी पोषाख चढवून नानासाहेब बाहेर निघून जातात. ते स्वतःच पत्नीला फिल्म प्रोडयूसर, अमेरिका, जपान, यांच्याकडून निरनिराळ्या कामांसाठी ऑफर्स आल्याचा फोन करण्याची व्यवस्था करतात. मग सावकाश घरी येतात.

हा फार्स आहे. यात फार्समध्ये असणाऱ्या सर्व गोष्टी आहेत. नेहमीच्या फार्समधे असणारी अतिशयोक्ती आहे. पती-पत्नीचे झगडे आहेत. जाडी बाई आहे. भित्रा पुरुष आहे. पत्नीचा पतीविषयीचा संशय आहे. मात्र हे सारे असूनही हा ठरीव ठशाचा फार्स वाटत नाही. याचे कारण श्री. गाडगीळांची प्रतिभा. विनोदाचे संकेत मराठी रंगभूमीवर निर्माण झाले आहेत. एकच वाक्य रडया सुरात पुन्हा पुन्हा घोकणे, काही विचित्र शारीरिक हालचाली एकसारख्या करणे हे ते संकेत. 'नसती बिलामत' या संकेतांपासून मुक्त आहे. या नाटकात अनेक प्रकारे विनोद येतो. कधी तो केवळ शब्दात येतो. जपानी संस्थेचे 'मिशापुशी' हे नाव ऐकूनच हसू येते. काही ठिकाणी विनोद दृश्यात आहे. प्रा. बिलामत पडद्यातून फक्त तोंड बाहेर काढून पुकारा करतात, 'I want clases' ते फक्त तोंड बाहेर काढणे फार विनोदी वाटते. नानासाहेबांची दूरचित्रवाणीसाठी घेतलेली मुलाखत हे दूरदर्शनावरील काही मुलाखतीचे उत्कृष्ट विडंबन आहे. अनपेक्षिततेमुळे निर्माण होणारा विनोदही येथे आहे. फिल्म प्रोडयूसर फोनवर 'सौ. सहस्रबुद्धयांना कजाग बाईचे काम करण्यासाठी पंचवीस हजार रुपये देईन म्हणतो. तिच्याशेजारी उभा असलेला बातमीदार खूण करतो एवढ्यात कबूल होऊ नका. आणखी मागा ती फोनवर म्हणते 'पंचवीस हजारात होणार नाही.' 'मग किती?' बाई जीव एकवटून बोलतात, 'सहव्वीस हजार'. पन्नास हजार किंवा तत्सम रकमेऐवजी ही अनपेक्षित रक्कम ऐकून प्रेक्षकात एकच हशा उसळतो. असे हे विनोद सतत तीन तास चालू असतात.

या फार्समध्ये काही गोष्टी किंचित खटकतात. नानासाहेबांनी राणीच्या बागेतल्या का असेना; पण वाघाच्या मिशा कशा आणल्या याचे फार्सला साजेसे हलकेफुलके समर्थन हवे होते. सहस्रबुद्धेबाई एकसारख्या नवऱ्याच्या डोक्यावरच्या जंगलाचा उल्लेख करीत होत्या; परंतु त्या नवऱ्याच्या म्हणजे शास्त्रज्ञाच्या डोक्यावरचे केस मात्र अगदी विरळ दिसत होते जरी ते केस कापून आल्याचा उल्लेख होता. म्हणून डोक्याचे जंगल दिसण्याची आवश्यकता

नव्हती तरी विरळ दिसत नाहीत.

नाटकाचे लेखन कितीही उत्तम असले तरी ते योग्य प्रकारे प्रेक्षकांपर्यंत पोहोचविणे दिग्दर्शक आणि कलाकार यांच्या हातात असते. इंडियन नॅशनल थिएटरच्या कलाकारांनी आपली कामगिरी चोख बजावली आहे. विजय घमंडे (नंदु), मनोरमा वागळे (सौ. सहस्रबुद्धे), रमेश पवार (अण्णा), कुसुम सुळे (विमलाबाई), आनंदा नांदोसकर (रिपोर्टर), चंद्रकान्त राणे (इन्स्पेक्टर वाघ) आत्माराम भेंडे (श्री. सहस्रबुद्धे) लता म्हापसेकर (पुष्पा परांडे) यांना आपापल्या भूमिकेचे उचित भान आहे. रमेश पवार यांनी उभी केलेला भित्रा, खादाड, कांगावखोर अण्णा विशेष लक्षात राहतो. नाटकातील लहान भूमिका करणारे कलावंत अभिनयनिपुण नसले तर फारसे बिघडत नाही; परंतु ते अभिनयकुशल असले तर रंगत आणखी वाढते. येथे श्री. हरिश्चंद्र परब, श्री. विलास दिघे, श्री. सुनील दिघे श्री. शाम विश्वासराव, श्री. बुलनाथ कुडतडकर या अगदी दुय्यम भूमिका करणाऱ्या कलाकारांनी नाटकाला उठाव आणला आहे. नाटकाची रंगत वाढविली आहे. तरीही दुसरा आणि तिसरा अंक पाहताना एकसारखे वाटते, श्री. गाडगीळ लेखनात खूप वेगाने पुढे गेले आहेत. एकापेक्षा एक हास्याचे मजले चढविणारे प्रसंग त्यांनी रंगविले आहे. त्यांचे लेखन पहिल्या अंकापासून शेवटपर्यन्त चढते आहे; पण प्रयोग मात्र तसा वेगाने चढू शकत नाही. पहिल्या अंकातील गतीनेच तो शेवटपर्यन्त जातो.

चावट लैंगिक विनोदांच्या या जमान्यात अश्लीलतेचा स्पर्श नसलेले हे निखळ विनोदी नाटक आहे. इंडियन नॅशनल थिएटरने 'छिन्न'सारखे भडक आणि निरर्थक नाटक करण्यापेक्षा आणि श्री. भेंड्यानी 'आगंतुक'सारखे केवळ निरर्थक नाटक दाखवण्यापेक्षा अशी नाटके दिली तर मराठी रंगभूमीवर आणि प्रेक्षकांवर उपकार होतील. समजा उपकार झाले नाहीत तर निदान अपकार होणार नाहीत याची खात्री. ✱

# बाळबोध पण प्रेक्षणीय
# देशमुखवाडी

वीस लोकांनी एकत्र येऊन सहकाराने 'मेघदूत' ही नाटक कंपनी स्थापन केली आहे. या 'मेघदूत'चे 'देशमुखवाडी' हे पहिलेच नाटक आहे.

नाथमाधव यांच्या 'देशमुखवाडी' या कादंबरीवर काही दिवसापूर्वी एक नभोनाट्य सादर झाले होते. त्याच कादंबरीचे हे नाटकरूपांतर श्री. यशवंत रांजणकर यांनी केलेले असून दिग्दर्शनही त्यांनी स्वतःच केले आहे. या नाटकाचा बारावा प्रयोग १० नोव्हेंबर १९७९ या दिवशी संध्याकाळी चार वाजता साहित्य संघ मंदिर गिरगाव येथे झाला.

बळवंतराव या स्वार्थी माणसाची देशमुखवाडी बळकावण्याची इच्छा आणि त्यासाठी त्याने केलेल्या उलाढाल्या हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

देशमुखवाडीच्या मालकांपैकी एका भावाचा मृत्यू होतो. दुसरा भाऊ परागंदा होतो. यामुळे त्यांचा मेहुणा बळवंतराव देशमुखवाडीचा कारभार पाहू लागतो. त्याची पत्नी सगुणाबाई म्हणजे मूळ देशमुख घराण्यातील कन्या, अतिशय सुशील, साध्वी स्त्री आहे. मृत पावलेल्या भावाच्या मुलावर-यशवंत आणि कृष्णी यांच्यावर तिचा जीव आहे. बळवंतराव त्यांचे, विशेषतः यशवंताचे हाल करतो. त्याला नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. सगुणाबाईचे नवऱ्यापुढे काही चालत नाही. बळवंतरावाचे यशवंताला मारण्याचे बेत यशस्वी होत नाहीत. प्रभाकरला कारकुनी करायला लावून सरदेसायांची इस्टेट घशात घालणेही बळवंतरावांना मुकुंदशेटजीमुळे आणि कोणा महाजनामुळे शक्य होत नाही. महाजन म्हणजे परागंदा देशमुखच निघतो. तो बळवंतरावाच्या नावे इस्टेट केल्याचे मृत्युपत्र खोटे म्हणून सिद्ध करतो. त्याच्यासकट सर्वांना एकदम मारण्याचा बळवंतरावाचा बेत फसतो. बळवंतरावाला वेड लागते. येथे नाटक संपते.

कथानकातील पात्रे सरळ दोन विभागात विभागली आहेत. सत् पक्ष आणि असत्पक्ष. बळवंतराव आणि त्याचा मुलगा बंडू हे असत्पक्षी आणि बाकी सगळे सत्पक्षी. शेवटी सत्पक्ष विजयी होऊन 'सत्यमेव जयते' हे पारंपारिक ब्रीद प्रेक्षकांच्या मनावर ठसविले जाते. असे हे ठरीव ठशांचे बाळबोध नाटक असले तरी तीन तास आपण गुंतून त्यात पडतो. कंटाळा येत नाही. पात्रांची विभागणी सत्-असत् अशी ढोबळ असली तरी पात्रे निर्जीव वाटत नाहीत. याचे कारण कोणाला सर्वगुणसंपन्न 'हिरो हिरॉईन' बनविले नाही. यशवंता करारी आणि प्रामाणिक असला तरी येताजाता या गुणांचे प्रदर्शन मांडीत नाही. जेवायला मिळणार नाही किंवा ताप येतो तेव्हा तो अगदी अगतिक होतो. मात्र प्रसंगी अगतिक होत असला तरी दुबळा, स्वत्वहीन वाटत नाही. सगुणाबाई आजारी असली, नवऱ्यापुढे तिचे काही चालत नसले तरी तिला कारुण्याची मूर्ती बनविले नाही. रायवा वगैरे नोकरमाणसेही बळवंतरावाच्या विरुद्ध असली तरी त्याच्याच हुकमतीप्रमाणे वागतात. एकदम बाणेदारपणे त्याच्याविरुद्ध जात नाहीत. सत्तेपुढे नमून वागण्याचा सामान्य माणसाचा स्वभाव त्यात दिसतो. सत्प्रवृत्त पण समर्थ मालक परत आल्यावरच सगळे नोकरचाकर यशवंताच्या बाजूला झुकतात असे दाखविण्यात वास्तवाचे उचित भान ठेवले आहे.

नाथमाधव यांची कादंबरी आणि श्री. यशवंत रांजणकर यांचे नाटक रूपांतर दोन्ही


सारख्याच दर्जाचे वाटतात. कादंबरीत तीसचाळीस पात्रे सहज आहेत. नाटकात अनेक पात्रांना फाटा देऊन केवळ एकोणीस पात्रे ठेवली आहेत. त्यातील आठ पात्रे मुख्य असून बाकीची दुय्यम आहेत. कादंबरी या माध्यमातून नाटकाच्या माध्यमात येताना पात्रांच्या संख्येत झालेली ही काटछाट अतिशय योग्य वाटते. बळवंतरावांची मुलगी वत्सला हिचे पात्र श्री. रांजणकरांनी गाळले याचे नवल आणि कौतुक वाटते. कारण त्यातून प्रभाकर-कृष्णी-वत्सला असा प्रेम-त्रिकोण (सर्व स्थलकाली लोकप्रिय) मिळू शकत होता. पण श्री. रांजणकरांनी तो मोह टाळला आहे. बळवंतरावांना वेड लागल्याचे नाथमाधवांच्या कादंबरीत नाही. मूळ कादंबरीत त्याचे हृदयपरिवर्तन होते. शेवट सर्वप्रकारे गोड होतो. येथे नाटकात मात्र बाकी सर्वांचे भले होते पण बळवंतराव शेवटपर्यंत बदलत नाही. त्याला वेड लागते. त्याची शोकांतिका होते आणि बळवंत-रावाच्या व्यक्तिमत्वाला अनुसरून तीच अधिक योग्य वाटते.

नाटकाचा प्रयोग एकंदर ठाकठीक होतो. सिताराम खैरे (बळवंतराव) किरणकुमार, (प्रभाकर), प्रविण देवस्थळी (यशवंत), लहू कनवाळे (वंडू), वामनराव पटवर्धन (दाजी/देवराव महाजन ऊर्फ अण्णा देशमुख), शांताराम खामकर (सुभान पाटील), दिनानाथ लाड (शास्त्री), सुकुमार (रायबा), दत्ता राणे (मुकुंदशेठ/हरीभाऊ), अशोक इंदुलकर (गवळ्या/राध्या), लता अरुण (सगुणाबाई), सुनिता धोंड (सावित्रीबाई), शुभांगी रावते (कृष्णी) हेमन्त काराणे, वसंत काते, प्रभाकर सावंत (मजूर) या सर्व कलाकारांनी आपापल्या भूमिका व्यव-स्थित सांभाळल्या आहेत. तीन कलाकारांनी दोन भूमिका केल्या आहेत. यामुळे तसे फारसे बिघडत नाही. पण प्रेक्षकांचा थोडा घोटाळा होऊ शकतो. कारण एकाच व्यक्तीने अधिक भूमिका करणे या नाटकाच्या प्रकृतीत बसत नाही. देशमुखांचे श्रीमंती घर, देसायांचे साधेसुधे घर योग्य रीतीने दाखवले आहे.

लेखनात आणि प्रयोगात एकंदर ठीक असलेले हे एक बाळबोध नाटक आहे. ☐


**हुकुमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**



**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

**लेखक : वि. ग. कानिटकर**
**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**
**किमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

पुणे केंद्र

# राज्य नाट्य स्पर्धा–वर्ष १९ वे

## अटीतटीची ' स्पर्धा ' झालीच नाही.

सरकारी खर्चाने भरविल्या जाणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धेचा पुणे केंद्राचा 'नाट्य महोत्सव' (सरकारी शब्द!) नुकताच पार पडला. महोत्सव संपल्या संपल्या तत्परतेने निकालही लावला गेला. निकाल पाहिल्यावर स्पर्धांकडे पाहण्याच्या परीक्षक या जमातीबद्दलच्या दृष्टिकोनाबद्दल मनातून (विनाकारण) चिंता वाटू लागली. राज्य नाट्य महोत्सवाला अलीकडीलकाळात नाट्य क्षेत्रात प्रतिष्ठा मिळू लागली आहे ही प्रतिष्ठा त्याच्या दर्जामुळे मिळाली यात शंका नाही, पण दर्जा ठरवायचा कोणी? असा प्रश्न उपस्थित झाल्यावर परीक्षक आणि प्रेक्षक यांच्यामध्ये तात्त्विक द्वंद्व निर्माण होणे स्वाभाविक आहे. यंदाच्या स्पर्धेच्या एकोणिसाव्या वर्षी पुनःश्च एकदा हे घडले आहे.

एकूण महोत्सवाचा दर्जा फारसा समाधानकारक नव्हता. 'अगदी विशेष' असं एकही नाटक वाटलं नाही. सर्वांनीच आपापल्या परीने खूप प्रयत्न केले यात शंका नाही. या प्रयत्नांचे दर्शनी फल निकाल असला तरी प्रेक्षकांची दादही महत्त्वाची असते. या स्पर्धेत एकूण दहा स्पर्धक संघांनी भाग घेतला होता. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे त्यापैकी पाच संहिता संपूर्णपणे नव्या होत्या. पुण्यातील रंगभूमी फोफावतेय असं म्हणत असताना दर पंधरा दिवसांनी इथे एक प्रायोगिक नाटक सादर होऊ नये ही खंत असतेच. त्यासाठी नव्या संहितांची उपलब्धता असावी लागते. पण या नव्या संहिता अशा स्पर्धांमधून मिळाल्या, तरी त्याचे स्वरूप फक्त स्पर्धेपुरते असू नये ही अपेक्षा!

नमनाचं घेंबभर तेल घातल्यानंतर आता या दहा नाटकांच्या प्रयोगांबावत लिहिणे आवश्यक आहे. या दहा नाटकांपैकी ज्यांना बक्षिसे मिळाली अशी तीन नाटके सोडली तर बाकीची सात नाटके रद्दी होती असा संशय मनी येऊ देता कामा नये. त्यातही काही Potentials दिसून आली. तर आता नाटकांबाबत थोडंसं.

प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन (पी. डी. ए.) या नावाभोवती एक वलय निर्माण झालंय. ते वलय संस्थेच्या दर्जेदार प्रयोगातूनच निर्माण झालेलं आहे. तरी यंदाच्या वर्षी मात्र पी. डी. ए. ने प्रेक्षकांच्या (परीक्षकांच्याही) मनात अपेक्षित असलेल्या उंचीचा प्रयोग सादर केला नाही त्यांनी यंदा श्री. शाम फडके यांचं 'सत्यम् ब्रुवीमी' ...(मी खरं बोलतोय) हे नाटक सादर केलं. राजकीय संदर्भ असलेलं हे नाटक. भारतीय राजकारणावर उत्तरेकडील देश व पश्चिमेकडील देश यांचे जे प्रभुत्व चालू आहे ते जरा अतिशयोक्तीपूर्ण (एक्झॅगरेटेड) स्वरूपात फडकेंनी मांडलंय. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय राजकारण, देशातील राजकीय सद्यस्थिती व अस्थिरता यांचा सर्वसामान्य जनतेवर होणारा परिणाम व त्यातून क्रांतीची प्रेरणा घेऊन जनसामान्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता होण्यासाठी झगडणाऱ्या जय आणि स्वप्ना या युवकांची ही कथा. लोकाधिपती, लोकसामंत, शकुन, अनिवार्य, उत्तराधिपती, पश्चिमाधिपती... अशी पात्रांची नावं. भाषाही काहीशी ऐतिहासिक ढंगाची...पण संपूर्ण नाटकभर या भाषेमुळे एक प्रकारचा विशविशीतपणा जाणवला. कधीकधी तुमची आमची भाषा तर कधीकधी ऐतिहासिक ढंगाची भाषा. यातून या विशिष्ट प्रकारच्या भाषाशैलीचा, संवाद शैलीचा हट्ट समजूच शकत नाही.

नाटकाच्या प्रवेशांच्या रचनेमुळे नाटक फारच सैल वाटले. त्यात पात्रांना प्रेक्षकांच्या मनात असलेल्या व्यक्तींच्या इमेजेस् दिल्यामुळे नाटकाला एक आयडेंटिफिकेशन प्राप्त झाले...आणि घोटाळा झाला. लेखनाच्या दृष्टीने हे एक फसलेले नाटक वाटते. अनेकदा लेखकाचे स्वतःचे काही घोटाळे झाले आहेत. त्यामुळे काही प्रसंगांची मांडणी करताना नेमका कुठला मुद्दा महत्त्वाचा याचे भान लेखकाला राहिलं नाही. त्यामुळे नाटक एकूण पोकळ वाटले.

पी. डी. ए. चा प्रयोग म्हटल्यावर प्रयोगातील सफाई दिग्दर्शक अजित सातभाई यांनी आणली होती. शकुन झालेले दिलीप वेंगुर्लेकर यांच्या कामातील सहजता व बारकावे उल्लेखनीय.

पार्श्वसंगीतातील ड्रम्सचा वारेमाप वापर व कलाकारांचे सदोष उच्चार (उदा. अनावृत्त, निरातिशय वगैरे) खटकणारे.

ॲक्टिव्ह थिएटर्स या संस्थेनं अमोल–अनुया–दिलीप या त्रयीने गाजविलेलं 'आपलं बुवा असं आहे' या मनोहर शहाणे लिखित नाटकाचा प्रयोग सादर केला. ही एक हलकी फुलकी प्रेमकथा. साधी पण सुरेख कॉमेडी. पण ते सारं करताना ॲक्टिव्हच्या सुरेश कोकीळ यांची तारांबळ उडाली.

अपुरं पाठांतर व तिसऱ्या अंकातील नेपथ्य बदलताना झालेली बिलामत यामुळे कशासाठी हा अट्टाहास असा प्रश्न पडला. मूळ सादर केलेलं नाटक जसंच्या तसं बसविताना दिग्दर्शकांनी ही गोष्ट कशी काय दुर्लक्षिली? नाटकातील प्रॉपर्टी हाताळण्याची सवय केलेली नसल्यामुळे स्टेजवर संवाद म्हणणे पात्रांना केवळ अशक्य वाटत होते. मानसी कोळीळ यांना त्यांच्या अभिनयाबद्दल प्रमाणपत्र मिळालं. प्रताप मालेगावकर यांनी प्रकाशाची भूमिका समजून केली.

पार्श्वसंगीताचा अभाव व नेपथ्याची अयोग्य मांडणी हे प्रयोगातील दोन महत्त्वाचे दोष होते. त्याचप्रमाणे पात्रांचे कच्चे पाठांतर यामुळे 'प्रयोग पार पडला' एवढंच म्हणता येईल.

दिलीप जगताप यांचं 'येक असतो महाराजा' हे राजकीय पुढाऱ्यांवर विनोद करणारं नाटक सपदा थिएटर्सने सादर केले. जगतापांनी नाटकात वेगवेगळे डिव्हाईस वापरले असले तरी ते दिग्दर्शकाला समर्थपणे पेलता आले नाहीत. लेखनातही काही प्रवेश (पत्रु भिंगे हे पात्रही) काही वेळा अनाठायी आले आहेत. नाटकाचा प्रयोग पाहताना त्यातला विनोद अगदी वेगळ्या पद्धतीने प्रेक्षकांपर्यंत पोचत होता असं दिसलं. प्रभाकर वाळके यांनी महाराजाची भूमिका करताना भयंकर हातवारे करून हसवण्याची गरज नव्हती. त्यामुळे एकूण नाटकाचा बाज बिघडला. वाचिक अभिनयापेक्षा आंगिक अभिनयावर एकूण नाटकात भलताच भर दिला होता. राजा म्हणजे खुळा माणूस या जुन्याच समीकरणाभोवती गुंफलेलं हे कथानक. नेपथ्य मात्र उल्लेखनीय. प्रयोग नेटका झाला तरी अपेक्षित परिणाम साधणारा ठरू शकला नाही.

आयुष्यात पैसा हेच सर्वस्व समजून पैसा मिळवताना वाटेत आडव्या येणाऱ्या प्रत्येकाला यमसदनास पाठवून खोट्या अहंकाराने जगणाऱ्या अशोक परांजपेची कथा 'ग्रॅण्ड मास्टर' या नाटकाद्वारे सादर करण्यात आली. लेखक प्रकाश सावरकर यांनी हे नाटक फारच बटबटीत आणि पूर्णतः व्यावसायिक दृष्टिकोनातून लिहिलेलं वाटलं. विषयात आणि संवादात कुठेही नाविन्य आढळलं नाही. लेखनात असलेली Complexity नाटकाला मारक मात्र ठरली. नाटकभर पैसा, स्त्री आणि दारू यांचेच संदर्भ. नाटक ज्या एकाच व्यक्तिरेखेभोवती फिरते ती अशोक परांजपे याची भूमिका, व्यावसायिक रंगभूमीवरील उदयोन्मुख कलाकार रमेश भाटकर यांनी आपल्या कसदार अभिनयाने सहजपणे पेलली. छद्मीपणा, क्षणोक्षणी पैशाविषयीची हाव, नवनवीन स्त्रियांविषयीची वैषयिक भावना, आपल्या शत्रूला जाळ्यात पकडून अगदी सहजपणे त्याचा समाचार घेऊन जगातील आणखी एका सुखावर कुरघोडी केल्याची जाणीव या सर्व बारकाव्यांनिशी रमेश भाटकरांनी अशोक सजीव केला– दिलीप कदम यांचे नेपथ्य वाखाणण्यासारखेच होते. प्रयोगात संहितेव्यतिरिक्तचा दिग्दर्शक कुठंच दृष्टोत्पत्तीस आला नाही. रमेश भाटकर व स्वरूप खोपकर यांना अभिनयाची प्रमाणपत्रे मिळाली.

'एक होती राणी' हे डॉ. श्रीराम लागू लिखित नाटक पुणे युवक केंद्राच्या वतीने सदानंद बोरसे यांनी दिग्दर्शित केले. संस्थान नसलेल्या राणीची दैन्यावस्था, त्याला कंटाळून पळून जाणं, पण खरी राणी पळून गेली तरी एक सामान्य स्त्री राणी बनते, शिक्षाही भोगते... असा एक राजकीय संदर्भ त्या नाटकाला आहे. संहिता प्रयोगाच्या दृष्टीने फारच शब्दबंबाळ वाटली, त्यात दृश्यापेक्षा वैचारिकतेचा भाग जास्त होता. अर्थात या वैचारिकतेलाही दृश्यत्व देणे शक्य होतं. पण बोरसे त्यात कुठे तरी कमी पडले असं वाटलं. नंदिनी कानेटकरांचा अभिनय ही या नाटकाची जमेची बाजू. तिनं आपली भूमिका समजून त्यातल्या बारकाव्यांसह सादर केली. बाकीच्या सर्व पात्रांमध्ये 'टीमवर्क' असलं तरी नाटकाच्या परिणामात त्यामुळे फारशी भर पडली असं वाटलं नाही. काही वेळा तरल भाषेतील संवाद पात्रांनी नीटपणे सादर केले नाहीत. उदयन दीक्षितची भूमिकाही उल्लेखनीय. प्रयोग 'विशेष' झाला नाही तरी त्याने एक विशिष्ट उंची मात्र निश्चितच गाठली होती. उदयनने आपल्या भूमिकेत अभिप्रेत असणारे सर्व रंग सुरेख भरले. त्यामानाने सदानंद बोरसेंना आपल्या भूमिकेतला कणखरपणा, करारीपणा, मिलिटरीनेस दाखवता आला नाही.

नेपथ्य हीही या नाटकाची जमेची बाजू. पात्रांच्या हालचाली मात्र विस्कळीत वाटल्या. एकूण राज्य नाट्य स्पर्धेत या टीमने आपले वेगळे अस्तित्व दाखवून दिले !

या नाटकातील नंदिनी कानेटकरला अभिनयाचे पारितोषिक मिळाले.

'मोरूची मावशी' हे आचार्य अत्रेंचे एव्हरग्रीन नाटक. "रंगश्री"ने हे नाटक यंदा सादर केले. यापूर्वी याच प्रयोगाला इतर स्पर्धांत बक्षीस मिळाले असतानाही हे नाटक पुन्हा राज्यस्पर्धेत उतरविण्याचा संस्थेचा उद्देश अनाकलनीय होता. अत्रेंचा विनोद सादर करताना लागणारं टायमिंगचं भान दिग्दर्शक आणि प्रमुख कलाकार मोहन जोशी यांनी चांगलंच राखलं.

खरं तर 'मोरूची मावशी' हा मोहन जोशींचा 'एकखांबी तंबू' होता. मोहन जोशींचा सहज अभिनय, ढंग आणि मावशीच्या भूमिकेतील बारकावे हुचासह त्यांनी सादर केले. मोहन जोशी हे व्यावसायिक रंगभूमीवरचे कलाकार. त्यांनी हा प्रयोग त्याच स्कीलने बसवला होता. विशेषतः मावशीच्या भूमिकेत स्त्री पार्टी नटाची होणारी गंमत त्यांनी आपल्या आंगिक व वाचिक अभिनयाद्वारे समर्थपणे सादर केली. नाटकाचे नेपथ्यही उल्लेखनीय. पण रंगमंचाचा वापर करताना कलाकारांनी काटकसरच केली. मोहन जोशी व्यतिरिक्त सारी पात्रे रंगभूमीवर अंग चोरून किंवा विनाकारण भलतेच हातवारे करून वावरत होती. पण या नाटकाला परीक्षक त्रयीनं प्रथम क्रमांक दिला. का ? ते ठाऊक नाही– पण प्रयोग स्मूथ होणं, प्रेक्षकांना खिळवणारा होणं हे जसे नाटकाचे गुण आहेत तसेच टीम वर्कचा अभाव हा या नाटकाचा दोष वाटला. पण परीक्षकांपुढे आपण पामर काय करणार ? त्यांचे निकष त्यांनाच लखलाभ होवोत..

मोहन जोशींना त्यांच्या अभिनयाबद्दल अभिनयाचे प्रमाणपत्र मिळाले. नाटकाच्या यशात आचार्य अत्रेंचा वाटा महत्त्वाचा हे मानायलाच हवे !

संस्कृत विद्या मंदिर या संस्थेने कै. चिं. त्र्यं. खानोलकरलिखित 'असाही एक अश्वत्थामा' हे शोकात्म नाट्य सादर केले. मुख्यमंत्र्यांच्या खाजगी सचिवाने त्यांच्यावर लिहिलेल्या कादंबरीतील अनेक प्रसंग खोटे असल्याचे उघडकीस आल्यानंतर आणि मुख्यमंत्र्यांचे व खाजगी सचिवाच्या पत्नीचे संबंध असल्याचे सचिवास कळल्यानंतर त्याच्या उद्ध्वस्त झालेल्या आयुष्याचे सुरेख चित्रण या नाटकात पहायला मिळालं. मुख्यमंत्र्यांच्या पी. ए. ची ( रमाकांत ) भूमिका मंगेश तेंडुलकर यांनी अत्यंत संयमाने केली. स्टेजवरील सफाईदार हालचाल व भूमिकेची योग्य समज यामुळे रमाकांत उठावदार होण्यास मदत झाली. तेंडुलकरांना सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले. त्याचप्रमाणे रमाकांतची पत्नी विजयाचे काम सौ. अरुणा हसबनीस यांनी ताकदीने उभे केले. पोपटकरची भूमिका दिग्दर्शक भालचंद्र पानसे यांनी अत्यंत बटबटीत वठवली. आवाजातील अनावश्यक चढउतार व असंबद्ध हालचाली नाटकाच्या परिणामास हानीकारक ठरल्या.

'कोसळे आज इथे देव्हारा अर्थात मेलो–मेलो–मेलो ड्रामा' या भल्या मोठ्या नावाचं नाटक 'ड्रॉपर्स'नं सादर केलं. नाटकाचे लेखक–मुकुंद टाकसाळे, वर्षानुवर्षे एकाच पद्धतीनं होणाऱ्या ताई–दादाच्या कौटुंबिक नाटकाची टिंगल लेखकानं केलीय. मराठी प्रेक्षकाची याहूनही काही वेगळं पहायची इच्छा आहे, ताकद आहे – असंच लेखकाला नाटकातून सांगायचंय.

वाईट संगतीमुळे वाया गेलेल्या आपल्या भावाला ताळ्यावर आणण्याऐवजी त्याला पाठीशी घालणाऱ्या सद्‌गुणी सत्शील ताईची कथा मांडताना लेखकाने त्यातील अतिनाट्यावर भर दिला आहे. आईविना पोरका झालेला सदा मित्रांच्या संगतीने बिघडतो, हॉटेलात जातो, सिगारेट ओढतो व सिनेमा काढण्याचे खूळही डोक्यात घेतो. रीतीप्रमाणेच सदाचे व त्याच्या वडिलांचे एकमेकांशी

अजिबात पटत नाही. सिनेमासाठी कर्ज देणाऱ्या सावकाराशी बहिणीचे लग्न लावण्याचे सदा लिहून देतो. सिनेमा साफ कोसळतो. मग कृष्णकुमार संकटकरच्या चकरा सुरू होतात. नेहमीप्रमाणे शेजारचे काका आणि घरातला नोकर आयत्या वेळी वीस हजार रुपये उभे करून लाज राखतात. मग योगायोगांची खचाखच ! सदाच्या सिनेमाला पारितोषिक, सदाचं लग्न असा गोड गोड शेवट. असलं हे कंटाळवाणं कथानक मुद्दामहून मांडताना लेखकाचा उद्देश सफल करण्यात दिग्दर्शक अनंत कुलकर्णी यांचा वाटा मोठा आहे. प्रत्येक पात्राने आणि दिग्दर्शकानेही मेलो ड्रामाचे भान शेवटपर्यंत सांभाळलं —संयमित ओव्हर ॲक्टिंग करून नाटकाचा बाज सांभाळला. सुहास कुलकर्णींचा अभिनय मात्र विशेष उल्लेखनीय ! त्यांनी एकूण नाटकालाच उठाव आणला. टीमवर्क हाही या नाटकाचा गुण.

नाटकाला दुसरे पारितोषिक व अनंत कुलकर्णींना दिग्दर्शनाचे पारितोषिक व अभिनयाचे प्रशस्तिपत्र लाभले. मोरूची मावशीच्या तुलनेत या प्रयोगात नाविन्य, मांडणी, अभिनय या सर्वच बाबतीत जास्त उजवेपणा होता हे निःसंशय ! पण असो !

बादल सरकारांचं 'बाकी इतिहास' हे नाटक म्हणजे दिग्दर्शकाला आणि कलाकारांना आव्हानच ! शरद हा प्राध्यापक. त्याची पत्नी वासंती ही लेखिका. कथेच्या जर्मच्या शोधात हे दोघं स्वतःच सीतानाथ आणि कनकची कथा साकार करतात. शेवटी जीवनाचा भौतिक इतिहास सोडला तर बाकी इतिहास म्हणजे अस्तित्ववादाचा साक्षात्कार ! जगणं बंद करण्यापेक्षा मृत्यू बरा किंवा जगण्याचा खरा अर्थ काय ? असे मूलभूत प्रश्न बादलबाबूंनी अत्यंत प्रभावीपणे या माध्यमाद्वारे मांडलेत. अरविंद देशपांडेंचा अनुवादही सरस आणि 'नाट्यषट्कार' संस्थेच्या कलाकारांनी आपापल्या परीनं त्यांना न्याय दिला.

मृत्यूच्या तीन छटा, दर्शन घडविताना श्री. अजय कुलकर्णी यांनी शरद, सीतानाथ–१, २ व ३ या चारही भूमिका आपल्या संयत अभिनयाने उत्कृष्टपणे सादर केल्या. नाटकातल्या आशयाशी दिग्दर्शकानं कुठंही प्रतारणा केली नाही. (अशा प्रकारच्या नाटकात आशयाचं आणि दिग्दर्शकाच्या समजलेपणाचं नातं फार जवळचं असतं.) त्यांना रत्नमाला राठोड यांनी चांगली साथ दिली. या नाटकाने या कलाकारांबद्दलच्या अपेक्षा उंचावल्या हे मात्र खरे ! रघुनाथ माटेंची प्रकाशयोजना व रवी ओकांचं ध्वनिसंकलन नाटकाच्या परिणामकारकतेला पूरक होतं.

या नाटकाला तिसरा क्रमांक प्राप्त झाला. आणि विजय कुलकर्णींना अभिनयाचे प्रमाणपत्र मिळालं.

श्री. ह. मो. मराठे लिखित 'हद्दपार' या नाटकाचा प्रयोग भरत नाट्य मंदिरातर्फे सादर करण्यात आला. बंद खोलीत बंदिस्त केल्या गेलेल्या स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होते–ती बंड करून उठते–यातून संसाराला मूठमाती–अस्थिरता निर्माण होते. हे स्वतंत्र सामाजिक नाटक सादर करताना भरतच्या कलाकारांनी प्रयत्नांची शर्थ केली. पण नाट्यबीज कितीही चांगलं असलं तरी तो विषय–त्याचा आवाका दिग्दर्शकांच्या ध्यानी आलेला दिसला नाही. राजा फडणिसांचे सदोष उच्चार, अवास्तव हालचाली व अभिनय (याचीच पुनरावृत्ती इतर कलाकारांमध्ये !) यामुळे नाटक कंटाळवाणे झाले. त्यातल्या त्यात मकरंद केळकर ठीक. नाटक विस्कळीत वाटले. पण नाटकाचे संपादन फारच अवाजवी झाल्यामुळे की काय ते 'जंपी' वाटलं. या विषयाचा स्पॅन लक्षात घेता ते दोन तासात संपणारं नाटक नाही असंच वाटलं.

हा लेख लिहीत असतानाच निकाल हाती आले. निकाल पाहून काहीच प्रतिक्रिया न नोंदवणे हेच बरं असं वाटलं. परीक्षक ल. गो. भागवत, नरेंद्र बल्लाळ व कमल परचुरे यांनी निकालासाठी कोणते निकष लावले असावेत ते मात्र ध्यानात आले नाही. असा हा पुण्यनगरीतला एकोणिसावा नाट्य महोत्सव सुफळ संपूर्ण झाला !

— मुकुंद संगोराम

— शरद पायगुडे


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## सप्रेम नमस्कार....

मुखपृष्ठ २ वरून

विद्यार्थी, इंजिनिअर्स मदत देतात. आपल्या नियतकालिकात त्याचे चरित्र अवश्य प्रसिद्ध करण्यासारखे आहे.

(२) The Pearly Gates Syndicate or How to Sell Real Estate in Heaven by Charles Merril Smith–Publishers Double day and Co; New York 1971. लेखक व त्याचे पूर्वज पाद्री होते. ख्रिश्चन धर्माच्या नावाने चाललेला भंपकपणा हा विषय. याचे रूपांतर अवश्य प्रसिद्ध करण्यासारखे आहे.

११ नोव्हें. ७९ **वि. ल. खरे**, नागपूर

◻ माणूसचा दिवाळी अंक कालच वाचून संपवला. शांतपणे एकेक लेख, कथा वाचली. अगदी मणिकांचनपासून सुरुवात करून शेवट डॉ. कार्व्हरने केली आणि मनात विचार आला, शेकडो दिवाळी अंक आपापल्यापरीने वाचकांचे रंजन, प्रबोधनसुद्धा करण्याचा प्रयत्न करत असतात. पण मला आपल्या माणूसमधील दि. बा. मोकाशी, विनय हर्डीकर आणि विशेष करून सौ. वीणा गवाणकर यांची डॉ. कार्व्हर ही चरित्रकथा फारच आवडली. डॉ. कार्व्हर हे पुस्तक आपण नेहमीप्रमाणे प्रसिद्ध करालच. पण ते प्रसिद्ध करताना बाल वाचकांचाही विचार करा व त्याची किंमत कमीतकमी ठेवण्याचा यत्न करा म्हणजे अधिकाधिक वाचकांकडून ते वाचले जाईल.

**ज. वि. धायगुडे**

१४ नोव्हें. ७९ मु. पो. भादे.

◻ लिहिण्यास थोडा उशीर होत आहे त्याबद्दल दुःख वाटतं. आपल्या दिवाळी अंकातील 'एक होता कार्व्हर' ही सौ. वीणाबाई गवाणकर यांनी लिहिलेली कादंबरी ही केवळ कादंबरीच नाही तर खऱ्या माणसाचं त्यांनी घडवलेलं हे एक सत्य पण हृद्य दर्शन आहे. सौ. गवाणकर यांच्याच शब्दात सांगायचं झालं तर 'आत्तापर्यंत जे वाचलं ते खरं वाचणं नव्हतंच, 'कार्व्हर' यांचं चरित्र जेव्हा मी वाचून पूर्ण केलं तेव्हा कुठे वाचन खऱ्या अर्थाने सार्थकी लागल्यासारखं वाटलं. 'असं म्हटलं तर ते खोटं ठरू नये. एक अमोल ठेवा आपण सादर केलात याबद्दल धन्यवाद !

निःसंशय 'माणूस' वाचकांच्या कसोटीस उतरला आहे. 'एक होता कार्व्हर' व्यतिरिक्त 'आदरे लेखकु जाहला' व 'राष्ट्रपती भवन' आदी लेखही मनापासून आवडले.

या आधीच मी 'माणूस'चा नियमित वाचक का झालो नाही याचंही आता अतीव दुःख होत आहे. असो.

१४ नोव्हें. ७९ **प्र. शां. खेडलेकर**, नासिक

◻ आपल्या दीपावली अंकातील संपादकीय फार आवडले. अत्यंत वास्तववादी पण तेवढ्याच सहानुभूतीने आपण सद्यःस्थितीची थोडक्यात चिकित्सा केली आहे, त्यामुळे ते हृद्य झाले आहे.

'एक होता कार्व्हर' हा सौ. वीणा गवाणकर यांचा प्रदीर्घ लेख वाचला. लेखन मननीय आहे. लेखिकेचे निवेदनच इतके ओघवते आणि हृद्य झाले आहे की, नकळतच आपण लेख वाचू लागतो.

आपल्या देशातील जीवन फारच वैफल्यावस्थेत आहे. भ्रष्टाचार, स्वार्थसाधू वृत्ती, वचनातला खोटेपणा हे सारे पाहिले म्हणजे आपण प्रसिद्ध केलेला लेख किती समयोचित आहे याचे महत्त्व पटते. हे एक मोठे सामाजिक कार्यच आपण केले आहे.

'माणूस'ची परंपरा उंचावणारा आणि आजच्या काळाला अनुरूप असा लेख आपण प्रसिद्ध केल्याबद्दल आपणास धन्यवाद !

१३ नोव्हें. ७९ **गोपाळ एस. बर्वे**, वसई

'माणूस'च्या दिवाळी अंकातील 'माणिकांचन' हे संपादकीय वाचले. असे कुणीतरी लिहायला हवेचं होते. श्री. विनय हर्डीकरांचा 'लोकशाहीकडून प्रजाप्रभुत्वाकडे' हा प्रदीर्घ Balanced लेख वाचला. अतिशय आवडला. ह्याच्या जोडीला 'मौज' मधला श्री. वसंत पळशीकरांचा 'इंदिरा गांधींनी उपस्थित केलेले काही प्रश्न' हा तितकाच प्रदीर्घ लेख वाचावा. येत्या निवडणुकीत कोणी कसे वागावे, कसा विचार करावा ह्याबद्दलचा योग्य तो बोध ह्या दोन्ही लेखांमुळे नक्की होईल. पण मंडळी त्या मनःस्थितीत नाहीत हे एकूण परिस्थिती पाहिल्यावर वाटते. हेच दुःख.

परवाच्या ता. १० नोव्हेंबर, ७९ च्या 'माणूस'च्या अंकात माझ्या 'माणूस'च्या दिवाळी अंकातल्या 'केदार आणि नारायण' ह्या लेखावरील प्रतिक्रिया वाचली. द. वि पोतनीस म्हणतात ते चित्रमयजगतमध्ये आलेले प्रवासवर्णन बहुधा श्री. रामकृष्ण दामोदर रामेकरांचे 'सचित्र बदरी–केदार यात्रावर्णन' असावे. हे प्रवासवर्णन १९१७ साली चित्रमयजगतमध्ये येत होते. पण रामेकर वकील होते. शाळामास्तर नव्हते. श्रीमंत माणसाबरोबर शागीर्दासारखे ते हिंडले नसणे शक्य आहे. 'चित्रमयजगता' तच 'माझ्या हिमालयातील यात्रा' ह्या नावाने मोरेश्वर गोपाळ काळे ह्यांचे प्रवासवर्णन दोन भागात १९३१ मध्ये प्रसिद्ध झाले. पण श्री. काळे शागीर्दी करत होते किंवा काय ह्यासंबंधी कुठेच उलगडा नाही. उलट काळ्यांना श्रीमंताबद्दल, संस्थानिकांबद्दल असलेला राग ह्या प्रवासवर्णनात स्पष्टपणे व्यक्त झाला आहे. श्री. पोतनिसांना एक मजेची माहिती द्यायची तर जोधपूरच्या संस्थानिकावरोबर, व्हिक्टोरिया राणीच्या डायमंड ज्युबिलीच्या उत्सवासाठी श्री. रावजी भवानराव पावगी हे विलायतेस गेले होते व त्यांनी 'विलायतच्या प्रवासा'चे वर्णन प्रथम केसरीतून व नंतर पुस्तकरूपाने दोन भागात १८८९ त व १८९२ त प्रसिद्ध केले. नेरळच्या गोविंद हरी फडक्यांचे 'माझी तीर्थयात्रा'चे चारी भाग पुष्कळांना ऐकून ठाऊक आहेत. दि. के. बेडेकरांनीही 'साहित्य विचार' मध्ये फडक्यांच्या प्रवासवर्णनावर मार्मिक लिहिले आहे.

आपल्याकडे स्वतः प्रवासाला न जाता संस्थानिकांनी केलेल्या प्रवासाचे वर्णन लिहिण्याची टूम पडली होती. गणेश सदाशिवशास्त्री लेले ह्यांचे 'तीर्थयात्राप्रबंध' (१८८५) हे सरदार विंचुरकरांनी केलेल्या प्रवासांचे वर्णन आहे. त्यांत प्रत्यक्षतः विंचुरकरांना बिठुरला–ब्रह्मावर्ताला–बाजीराव दुसरे ह्यांचा काही काळ सहवास लाभला बाजीरावाची मनःस्थिती, परिस्थिती–ह्याचे साक्षात दर्शन त्यांना घडले, त्याचे लेलेकृत बहारीचे, उत्कट वर्णन वाचून पाहावे. लेलेशास्त्रीच बाजीरावांशी बोलताहेत असे वाटते. प्रवासवर्णनांत अशी fantasy काहीवेळा अनुभवाला येते. गौरीशंकरशास्त्री बिन्न अनंतशास्त्री यांचे 'यात्राकल्पलता' (१८८४) हेही विंचुरकरांच्याच यात्रेचे वर्णन होय.

पोतनिसांच्या प्रतिक्रियेने बरे वाटले. त्या समाधानातूनच हे पत्र लिहिले व मजपाशी जमवलेली माहिती दिली.

१५ नोव्हेंबर ७९ **चंद्रकांत वर्तक**, मुंबई

## चित्रपट

सदानंद बोरसे

# चिमणराव गुंड्याभाऊ

तसे हे दोघे आपल्याला अनोळखी, अपरिचित नाहीतच. स्वतःच्या चेहऱ्यावरची सुरकुतीही ढळू न देता साऱ्या महाराष्ट्राला हसविणाऱ्या चि. वि. जोश्यांच्या पुस्तकांतून हे दोघे आपल्याला भेटतात. चिमणअण्णा जोग (मालवणकर) आणि गुंड्यापंत दांडेकर (जोग) यांच्या रूपांत हे दोघे पडद्यावर समूर्त दिसलेही आहेत. अगदी याच चिमणराव गुंड्याभाऊबद्दल म्हणत असाल; तर हेसुद्धा दूरचित्रवाणी नामक वीतभर खोकड्यात बसून आपल्यापैकी बऱ्याच जणांच्या दारावर टकटक करूनही गेले आहेत. तर हे दोघे आपल्याला अनोळखी, अपरिचित नाहीतच. ते जेव्हा जेव्हा भेटले; तेव्हा तेव्हा त्यांच्या 'करायला गेलो एक' उचापती वाचून, पाहून आम्ही कधी गालातल्या गालात तर कधी पोट धरधरून हसलो आहोत. पण त्यांची सर्वात शेवटी आणि म्हणूनच सर्वात नवी झालेली भेट मात्र थोडीशी हसविणारी आणि बराचसा कंटाळा आणणारी होती.

दिग्दर्शक विनय धुमाळे यांचा 'चिमणराव गुंड्याभाऊ' हा चित्रपट प्रसिद्ध झाला. याच कल्पनांवर आधारित टी. व्ही. वरील कार्यक्रम बऱ्यापैकी लोकप्रिय झालेला होता आणि त्या कार्यक्रमातीलच चिमणराव ऊर्फ दिलीप प्रभावळकर आणि गुंड्याभाऊ अर्थात बाळ कर्वे चित्रपटातही आपल्या याच हातखंडा भूमिकेत आहेत. यापूर्वीच्या चिमणराव – गुंड्याभाऊंच्या वाचलेल्या, पाहिलेल्या भेटीमुळे ही विनोदी जोडगोळी आहे आणि ती आपल्याला हसवते एवढी कमीत कमी अपेक्षा बाळगून मी चित्रपटाला गेलो; पण शक्य तेवढे जास्त प्रसंग तेही एकमेकांशी काहीच संबंध धरबंध नसलेले नुसते एकापुढे एक मांडल्यामुळे ही माफक अपेक्षाही पूर्णांशाने पुरी झाली, असे वाटले नाही. संपूर्ण चित्रपटात एकूण पाच प्रमुख किस्से निवडले आहेत. (१) चिमणरावांच्या बालवीर चमूचे उपद्व्याप. (२) चिमणराव घर बदलतात. (३) गुंड्याभाऊची मोटर. (४) राजाभाऊ कोरान्ने यांच्या मुलीची सासरी पाठवणी अन् तिची तिच्या नवऱ्याशी फेरजुळणी. (५) चिमणराव सर्कशीत. या पाचही प्रसंगांची कथानके अत्यंत प्रसिद्ध असल्यामुळे ती पुन्हा वाचकांना वाचायला लावणे हा प्रकार करीत नाही. संपूर्ण चित्रपट सुमारे अडीच तासांचा असल्याने प्रत्येक प्रसंगाच्या वाट्याला साधारण अर्धा तास आला. आता या प्रत्येक प्रसंगामध्ये पोटप्रसंग वा उपकिस्से इतके होते की हा अर्धा तास फारच अपुरा ठरला. एखादी घटना सांगणे आणि ऐकणाऱ्याला रस वाटेल अशा तऱ्हेने खुलवून ती सांगणे यात फरक असतोच. विशेषतः जेव्हा ती घटना ऐकणाऱ्याला माहीत असते (आणि त्याला ती माहीत आहे, हे सांगणाऱ्याला माहीत असते) तेव्हा तर या खुलविणे वा रसभरणाला फारच महत्त्व येते. 'चिमणराव गुंड्याभाऊ'मध्ये कधी प्रसंग नको तितके फटाफट संपविले आहेत. (उदा. चिमणराव व गुंड्याभाऊ मर्तिकाचे सामान दुसऱ्याच्या घरापाशी ठेवतात तो प्रसंग किंवा वाजवीपेक्षा जास्त वाढवले आहे. (उदा.– चिमणरावांचे मोटर चालविण्यास शिकणे) काही ठिकाणी तर पुस्तकात लिहिलेली वर्णने अधिक प्रभावी वाटावीत इतकी ही पडद्यावरील दृश्ये निरस, आणि चटावरील श्राद्धाप्रमाणे उरकली आहेत. 'चिमणराव सर्कशीत' हे त्याचे उत्तम उदाहरण. शिवाय सर्वच प्रसंगांमध्ये विनोद एका विशिष्ट पातळीच्या वर राहणे किंवा राखणे अपेक्षित होते, तेही साधलेले नाही. कधीकधी हे प्रसंग विनोदी न ठरता हास्यास्पद ठरतात. उदाहरणार्थ– घर बदलण्यासाठी चिमणराव राम व रहीम या आपल्या ऑफिसातील शिपायांना बोलावतात तो प्रसंग. या संपूर्ण प्रसंगाचा त्या रामरहीम जोडगोळीने कधी नको नको इतका अभिनय करून, कधी फालतू स्टायली मारून, कधी फुटकळ पोरकटपणा करून पार विचका करून टाकला आहे. वेळेचे वाटप हा महत्त्वाचा भाग चित्रपटात बरेचदा दुर्लक्षित राहिला. उदाहरणार्थ– नवीन घरी आल्यानंतर अपरात्री चिमणराव चुकून भलत्याच खोलीत शिरतात. ती खोली एका वेश्येची. त्यातून होणारे घोटाळे, चिमणरावांच्या बायकोची, आईची या प्रसंगाला प्रतिक्रिया, चिमणरावांनी त्यांची समजूत काढणे एवढी साखळी त्या प्रसंगाला मिळाल्यानंतर या साखळीच्या प्रत्येक कडीला पुरेसा वेळ मिळणे आवश्यक होते; पण त्या वेश्येच्या तोंडात (आणि प्रेक्षकांच्या कानात) कोंबलेल्या गाण्याने हा सगळा वेळ खाऊन टाकला. बऱ्याचदा झालेले बऱ्याच गोष्टींचे पुनरुल्लेख टाळूनही हे वेळेचे वाटप अधिक चांगल्या रीतीने करता आले असते.

आणखी एक मोठी गल्लत म्हणजे एकदम पाच एकमेकांशी फारसा संबंध नसलेल्या प्रसंगांची केलेली निवड. दामूअण्णा आणि

विष्णुपंत जोगांचा 'लग्न पहावं करून' किंवा 'सरकारी पाहुणे' घेतला; तरी त्यातही एकच प्रसंग निवडून तोच पूर्ण वाव व वेळ घेऊन मांडला होता. पाच प्रसंग घेऊन ते उभे करण्याच्या प्रयत्नात सगळेच अधांतरी राहण्याचा प्रकार फार झाला आहे. याला एकमेव अपवाद म्हणजे राजाभाऊंच्या मुलीची त्यांच्या जावयाकडे– बापूराव सानेकडे केलेली पाठवणी. पण हेसुद्धा तो संपूर्ण प्रसंग उभा करणाऱ्या बापूराव साने ( मोहन गोखले आणि रा. ब. डोंगरे ( डॉ. श्रीराम लागू ) यांच्या कौशल्यामुळे शक्य झाले. चिमणराव व गुंड्याभाऊंचा वाटाही तितकाच महत्त्वाचा हे वेगळे सांगायला नकोच.

चित्रपटाचे नाव 'चिमणराव गुंड्याभाऊ' असले तरी खरी ही कथा वा हे किस्से चिमणरावाचेच. त्यामुळे जास्तीत जास्त वेळ कॅमेरा चिमणरावावर म्हणजेच दिलीप प्रभावळकरांवर राहिलेला. चिमणरावाची व्यक्तिरेखा पुस्तक वाचल्यानंतर वा दामूअण्णांचे काम पाहिल्यानंतर डोळ्यांपुढे उभी राहते ती तो एक भाबडा सामान्य माणूस म्हणून. तो अतिशय सरळ आहे म्हणूनच तो क्षणात रागावतो, क्षणात खुलतो. क्षणात रुसतो, क्षणात हसतो, क्षणात रडतो, क्षणात चिडतो. हे आपले भाबडेपणा जगाच्या लेखी बावळटपणा आहे,याचीही त्याला कल्पना आहे; त्यामुळे आपण बावळट वाटू नये म्हणून तो कधीकधी धूर्तपणाचे कातडे अंगावर चढवतो; पण आपल्या मूळ प्रकृतीला न झेपणाऱ्या त्या बोजाने अधिकच अजागळ, केविलवाणा बनतो. चिमणराव कल्पक आहे; पण व्यवहारी नाही, त्यामुळे त्याच्या चांगल्या कल्पनाही त्याला गोत्यात आणतात. या अव्यवहारीपणामुळेच आपल्याला झेपणाऱ्या कल्पना कोणत्या आणि न पेलणाऱ्या कल्पना कोणत्या याचा तो काहीही विचार करीत नाही आणि मग आपल्याच एखाद्या ओझ्याखाली चेंगरणारा चिमणराव हास्यविषय ठरतो. हा माणूस हुशार आहे; पण धांदरट आहे, भित्रा आहे, त्यामुळे त्याची हुशारीही व्यर्थ ठरते, त्याचा चांगुलपणाही त्याच्या अंगाशी तर येतोच पण इतरांनासुद्धा भोवतो. काही तरी करून दाखवण्याच्या इराद्याने केलेली सुरुवात, मग हळूहळू फसत जाणारे सर्व प्रकरण आणि मग झालेली फजिती लपविण्यासाठी सुरू झालेली केविलवाणी धडपड यातून चिमणरावाचे उपद्व्याप आणि गुंड्याभाऊचे निस्तरणे जन्म घेते. दिलीप प्रभावळकरांनी उभा केलेला चिमणराव मात्र संपूर्ण चित्रपटभर असा वाटत नाही. अत्यंत हलता व बोलका चेहरा जवळ असूनही प्रभावळकरांचा चिमणराव हा अत्यंत रटाळ वाटला त्याचे सर्वांत प्रमुख कारण म्हणजे त्यांची संवाद म्हणण्याची शैली. त्यांचा आवाज मुळातच बायकी आहे की त्यांनी मुद्दामच तो तसा लावला होता याची मला कल्पना नाही; पण अशा बायकी आवाजात एक उंच पट्टी लावून एकाच तऱ्हेचे हेल काढत सर्व संवाद म्हटल्यामुळे प्रभावळकरांनी बोलण्यासाठी तोंड उघडले की आपले कान मिटून घ्यावेसे वाटत. शिवाय आपल्या बायकोपासून आई, मुले, गुंड्याभाऊ, हपिसातील लोक या साऱ्याच लोकांशी एकाच लाडिक तऱ्हेने बोलणे त्यांना कसे काय जमले, हे माझ्यापुढे एक कोडेच आहे. त्यांनी उभा केलेला चिमणराव हा भावडा वाटला नाही; तर पोरकट वाटला. तो धांदरट वा अव्यवहारी न वाटता मतिमंद वाटला. अशा माणसाची जगात होणारी फरपट पाहून कीव येते; पण त्याला काहीतरी उपचार देण्याची आवश्यकता आहे असे वाटायला लागते. आम्हाला चिमणराव असाच Mentally retaeded दाखवायचा होता असे म्हटल्यास संपलेच; पण मला ते दाखविणे आणि म्हणणेही पटत नाही. चिमणरावाच्या या मध्यवर्ती व्यक्तिरेखेने आपल्या पायातच कुठे तरी असा मार खाल्ल्याने त्याचाही मोठा परिणाम संपूर्ण चित्रपटावर झाला आहे. दुसरा गुंड्याभाऊ तालीमबाज, डोक्याने टणक पण चिमणरावाचे घोटाळे निस्तरण्यास सदैव तत्पर असा गुंड्याभाऊ बाळ कर्व्यांनी मस्त उभा केला. अन्य कलाकारांमध्ये मोहन गोखले व डॉ. श्रीराम लागू यांचा उल्लेख यापूर्वी केलाच. चित्रपटातील एक मोठी फळी–चित्रपटातील बालकलाकार–मात्र फारच कच्ची राहिली असे वाटले. खोड्यांपासून गाण्यापर्यंत या बालचमूने केलेल्या बऱ्याच गोष्टी फारच रेखीव, ठरीव आणि त्यामुळे खोट्याखोट्या वाटल्या.

या सगळ्यावरोबरच सुरुवातीच्या निवेदनाचा उल्लेख करणे आवश्यक ठरेल. पुलंच्या या निवेदनाच्या वेळी चिं. वि. जोशींचे रेखाटलेले चित्र, दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्यचळवळ वगैरे गोष्टी आणि त्याचे पुणेरी पेठेतील पडसाद या कल्पना सुरेख.

चित्रपटातील गाणी असल्यामुळे वा नसल्यामुळे काहीच फरक पडत नव्हता. संगीतकार दत्ता डावजेकरांनी दिलेले पार्श्वसंगीताचे काही तुकडे चांगले होते.

तर चिमणराव गुंड्याभाऊची ही भेट वेगळी म्हणून स्वागतार्ह असली तरी अपेक्षापूर्ती करणारी नक्कीच नव्हती.

□